दैनिक
# महावृत्त
E-Mail:dainikmhavratt@gmail.com
संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990




लातूर वर्ष ३ रे अंक २२१ वा रविवार दि.०४ फेब्रुवारी २०२४ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.

## नमो चषक २०२४ विविध क्रीडा स्पर्धेचा मुरुड येथे उत्साहात शुभारंभ दरवर्षी २२ जानेवारीला लातूर ग्रामीणमध्ये क्रीडा महोत्सव आयोजीत करणार-आ. कराड




लातूर : - आयोध्येत प्रभू श्रीरामाचे मंदिर व्हावे ही लाखो, करोडो राम भक्तांची इच्छा देशाचे यशस्वी पंतप्रधान माननीय नरेंद्रजी मोदी साहेब यांनी पूर्ण केली आणि संपूर्ण देशभरात २२ जानेवारी रोजी दिवाळी साजरी झाली. या निमित्ताने यापुढे दरवर्षी लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघात तरुणांना आणि खेळाडूंना प्रोत्साहन देण्यासाठी २२ जानेवारीला क्रीडा महोत्सवाचे आयोजन केले जाईल असे भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांनी बोलून दाखवले.

भारतीय जनता युवा मोर्चाच्या वतीने नमो चषक २०२४ च्या माध्यमातून आयोजित लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघातील विविध क्रीडा स्पर्धेचा शुभारंभ भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांच्या शुभहस्ते १ फेब्रुवारी २०२४ गुरुवार रोजी सायंकाळी मुरुड येथे मोठ्या उत्साहाच्या वातावरणात झाला यावेळी आ. कराड बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुरुडच्या सरपंच श्रीमती अमृता अमर नाडे या होत्या तर यावेळी भाजपाचे जिल्हा सरचिटणीस विक्रमकाका शिंदे, महेंद्र गोडभरले, भाजयुमोचे प्रदेश सचिव ऋषिकेशदादा कराड, लातूर तालुकाध्यक्ष बन्सी भिसे, रेणापूर तालुकाध्यक्ष ॲड. दशरथ सरवदे, जिल्हा उपाध्यक्ष हनुमंतबापू नागटिळक, भागवत सोट, सतीश आंबेकर, ओबीसी मोर्चाचे डॉ. बाबासाहेब घुले, संगायो समिती अध्यक्ष वैभव सापसोड, भाजयुमोचे सुरज शिंदे, संजय ठाकूर, रवी माकोडे, महेश कणसे यांच्यासह भाजपाचे लोकप्रतिनिधी, पदाधिकारी, कार्यकर्त्यांसह खेळाडू आणि क्रीडा प्रेमी नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

खेळाडूंना संधी मिळावी, तरुणांना वाव मिळावा यासाठी लातूर ग्रामीण मतदार संघात मोठया प्रमाणात स्पर्धा होत आहेत. स्पर्धेत कोणीतरी जिंकत असतो कोणीतरी हरत असतो तेव्हा अपयशाने खचून न जाता पुन्हा नव्या उमेदीने आणि जिद्दीने खेळाडूंनी खिलाडू वृत्तीने खेळ खेळले पाहीजेत असे सांगून आ. रमेशअप्पा कराड म्हणाले की, पंतप्रधान नरेंद्रजी मोदी साहेब यांच्या नेतृत्वात देश सर्वच क्षेत्रात प्रगतीचे शिखर गाठत आहे. त्यात क्रिडा क्षेत्रही मागे नाही. देशभरातील विविध खेळाडूंना प्रोत्साहन दिले आणि खेळाडूंनीही जगात देशाचे नाव उंचावून अनेक पदके मिळवीली.

केंद्र आणि राज्य शासनाने गोरगरीब सामान्य जनतेच्या हिताच्या अनेक योजना सुरु केल्या, त्याचा लाभ असंख्य गरजूंना मिळत आहे. देशहिताचे आणि प्रगतीचे ऐतिहासीक निर्णय घेणारे पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांच्या नेतृत्वात तिस-यांदा केंद्रात भाजपाचे सरकार येणार असल्याचे सांगून या केंद्र शासनाला समर्थन देण्यासाठी लातूरचा खासदार विक्रमी मताने निवडूण द्यावा असे आवाहन आ. कराड यांनी यावेळी केले. मुरुड शहराच्या सर्वांगिन विकासासाठी राज्यातील महायुतीशासनाने पाणी पुरवठा योजना, उपजिल्हा रुग्णालय यासह विविध विकास कामासाठी कोटयावधी रुपयाचा निधी उपलब्ध करुन दिला मात्र भाजपा महायुती शासनाच्या योजनांचे श्रेय लाटण्याचा विरोधक प्रयत्न करत आहेत मात्र हे सर्व जनतेला ज्ञात आहे.

प्रारंभी युवा नेते ऋषिकेशदादा कराड यांनी स्पर्धेच्या आयोजनामागची भूमिका विशद करून लातूर ग्रामीण मधील खेळाडूंना राज्यस्तरावर खेळण्याची संधी मिळावी अशी अपेक्षा व्यक्त केली. भाजपाचे हनुमंतबापू नागटिळक, वैभव सापसोड, सुरज शिंदे, रवी माकोडे यांनी यावेळी आपले मनोगत व्यक्त केले कार्यक्रमाचे सूत्रसंचालन चंद्रकांत कातळे यांनी केले तर शेवटी संजय ठाकूर यांनी उपस्थितांचे आभार मानले.

यांप्रसंगी आ. रमेशआप्पा कराड यांच्या हस्ते विविध स्पर्धेसाठी नियुक्त करण्यात आलेल्या (परीक्षक) पंच यांचा सत्कार करण्यात आला. खो-खो, हॉलीबॉल आणि कबड्डी मैदानाचे पूजन करण्यात आले, खेळाडूंची ओळख परेड झाली त्यानंतर प्रकाश झोतात संकल्प क्लब मुरुड आणि शरदचंद्र महाविद्यालय शिराढोण या दोन संघात कबड्डीचा सामना झाला हर्षउल्हासात झालेल्या या सामन्यात बारा गुणांनी शिराढोणच्या संघाने विजय मिळवला. मुरुड येथे होत असलेल्या क्रीडा स्पर्धेत कबड्डी ३४ संघ, खो खो २० संघ, क्रिकेट ४८ संघ, हॉलीबॉल २२ संघ सहभागी झाले आहेत. याप्रसंगी आ. रमेशअप्पा कराड यांचा मुरुड ग्रामपंचायत, बांधकाम कामगार संघटना, शिवछत्रपती क्रिडा मंडळ यासह विविध क्रिडा संघटनांच्या वतीने सत्कार करण्यात आला. त्याचबरोबर भारतीय जनता युवा मोर्चाच्या वतीने उपस्थित प्रमुख पाहुण्यांचे स्वागत भाजयुमोचे सुरज शिंदे, संजय ठाकूर, महेश कणसे, अमर चव्हाण, रवि माकुडे, लहुराजे सव्वाशे, बालकृष्ण पुदाले, अक्षय भोसले, दत्ता पोटभरे, शुभम खोसे, समाधान कदम, सुरज देशमुख, सचिन लटपटे, विनोद कदम, किरण मुंडे, बालाजी गवळी, अमर पिंपरे, सचिन मस्के, प्रज्योत ढगे, योगेश पुदाले, राजकुमार नाडे यांच्यासह अनेकांनी केले. नमो चषक २०२४ क्रीडा स्पर्धेच्या माध्यमातून खेळाडूसह तरुणात आणि क्रीडाप्रेमी नागरिकात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. या स्पर्धा यशस्वी व्हाव्यात यासाठी भारतीय जनता युवा मोर्चाचे कार्यकर्ते मेहनत घेत आहेत.

## उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे लातूर विमानतळावर स्वागत





लातूर, दि. ३ (जिमाका): राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे सोलापूर दौऱ्यासाठी आज सकाळी लातूर विमानतळावर आगमन झाले. यावेळी जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे, जिल्हा पोलीस अधीक्षक सोमय मुंडे यांनी त्यांचे स्वागत केले. त्यानंतर उपमुख्यमंत्री ना. पवार यांनी लातूर येथून हेलिकॉप्टरने सोलापूरकडे प्रयाण केले. अपर पोलीस अधीक्षक अजय देवरे, जिल्हा नियोजन अधिकारी सोमनाथ रेड्डी, उपविभागीय अधिकारी रोहिणी नऱ्हे-विरोळे, तहसीलदार सौदागर तांदळे यांच्यासह अधिकारी, पदाधिकारी यावेळी उपस्थित होते.

## फकिरा ब्रिगेडच्या वतीने अण्णा भाऊ साठे यांच्या खंडाचे मोफत वितरण




लातूर (प्रतिनिधी):- साहित्यरत्न, लोकशाहीर अण्णा भाऊ साठे चरित्र साधने प्रकाशन समिती महाराष्ट्र शासनाच्या वतीने प्रकाशित अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्याच्या आठ खंडाचे मोफत वाटप लातूर जिल्ह्याचे खा.सुधाकर शृंगारे,आ.रमेश कराड, समितीचे सदस्य सचिव प्रा.डॉ.संजय शिंदे, सदस्य प्राचार्य डॉ.माधव गादेकर यांच्या हस्ते भालचंद्र ब्लड बँकेच्या सभागृहात करण्यात आले महाराष्ट्र शासनाने दिनांक ९ नोव्हेंबर २०२३ रोजी प्रकाशित केलेले हे खंड फक्त मुंबई, पुणे, कोल्हापूर, नागपूर, छत्रपती संभाजी नगर येथील शासकीय बुक डेपो मध्ये उपलब्ध होते. सदरील खंड इतर जिल्ह्यांत मिळत नाहीत अण्णाभाऊच्या साहित्याची समाजात खूप मोठी मागणी आहे त्यामुळे फकिरा ब्रिग्रेड या सामाजिक संघटनेच्या वतीने सदरील खंडाचे मोफत वितरण करण्यात आले या प्रसंगी प्रा. डॉ.संजय शिंदे यांनी अण्णा भाऊंच्या साहित्यातील मार्क्सवादी तत्वज्ञान आणि आंबेडकरी विचार सोदाहरण सांगून कम्युनिस्ट विचार आणि आंबेडकरी विचार प्रमाण मानून अण्णाभाऊंनी साहित्य निर्मिती केली असे मत व्यक्त केले.प्राचार्य डॉ. गादेकर यांनी अण्णा भाऊंच्या सर्व साहित्य, विचार, तत्वज्ञानाचे संशोधन ही समिती करीत असल्याचे सांगून अण्णा भाऊनी सामान्य माणसाच्या व्यथा, वेदना, त्यांचे जगणे, दुःख जगाच्या वेशीवर आणण्याचे महत्त्वाचे कार्य केले,आ.रमेश कराड यांनी अण्णा भाऊचे समग्र साहित्य प्रकाशित करण्यासाठी शासनाला कितीही खर्च आला तरी तो करून अण्णाभाऊचे साहित्य समाजापर्यंत घेऊन जाऊ अशा विधायक कामासाठी मी नेहमी मदत करीन अशी ग्वाही दिली या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी.खा.सुधाकर शृंगारे, हे होते अध्यक्षीय समारोपात शृंगारे म्हणाले की.महापुरूषांचे विचार समाजात घेऊन जाण्यासाठी सरकार लाखो रुपये खर्च करीत आहे महापुरुषांच्या विचारावरच सरकार काम करीत आहे.अण्णाभाऊ साठे आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे आपापल्या ठिकाणी श्रेष्ठ आहेत त्यांची तुलना समाजाने करू नये मी वेळोवेळी समाजाला मदत करीत आलो आहे पुढेही करीत राहणार याची हमी देतो.या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी संजय विरूळे, सचिन शिंदे, सुदर्शन शिंदे, पांडुरंग मस्के, मुकेश लोंढे, बाळासाहेब वाघमारे, सूर्यकांत कदम, गोविंद धबडगे, उर्मिला नवगिरे, सुभाष गायकवाड यांनी प्रयत्न केले कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.राजेंद्र लोदगेकर यांनी मानले तर आभार श्रीरंग सरवदे यांनी मानले

## गाव चलो अभियानाच्या माध्यमातून भाजपा प्रत्येक मतदारापर्यंत पोहोचणार ‘मोदी की गारंटी’ आता गावागावात माजीमंत्री आ.संभाजी पाटील निलंगेकर यांची माहिती




लातूर (प्रतिनिधी):-भारतीय जनता पार्टीतर्फे ४ ते ११ फेब्रुवारी या काळात व्यापक जनसंपर्कासाठी ’गाव चलो अभियान’ राबविण्यात येणार आहे. या अभियानात उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्यासह राज्यातील सर्व केंद्रीय मंत्री, खासदार, आमदार, प्रदेश पदाधिकारी त्यांना दिलेल्या गावात एक दिवस मुक्कामी राहणार आहेत, अशी माहिती माजीमंत्री आ.संभाजी पाटील निलंगेकर. यांनी दिली.या अभियानाच्या माध्यमातून लातूर लोकसभा मतदारसंघातील साडे तीन लाख घरांना भेटी देण्यात येणार असुन याकरीता पक्षाचे सर्व लोकप्रतिनिधी, पक्ष पदाधिकारी व सुपर वॉरियर्स या अभियानात सहभागी होणार आहेत. या अभियानासाठी आवश्यक असणारी सर्व तयारी झालेली असुन या अभियानाद्वारे आगामी लोकसभा निवडणुक विक्रमी मताधिक्याने जिंकण्याचा संकल्प केला असल्याचे माजीमंत्री आ.संभाजी पाटील निलंगेकर यांनी पत्रकार परिषदेत सांगितले लातूर येथील शासकीय विश्रामगृह गाव चलो अभियानाची माहिती देण्यासाठी आयोजित पत्रकार परिषदेत माजीमंत्री आ.संभाजी पाटील निलंगेकर बोलत होते. यावेळी जिल्हाध्यक्ष दिलीपराव देशमुख, जिल्हा सचिव, ॲड.भारत चामे, शहर सरचिटणीस शिरीष कुलकर्णी, तुकाराम गोरे,बब्रुवान खंदाडे आदीची उपस्थिती होती. आगामी लोकसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर उत्तम संघटनात्मक बांधणी करत, विकासाचा अजेंडा डोळ्यासमोर ठेवून भाजपा कार्य करत आहे. तळागाळातील प्रत्येक मतदारापर्यंत मोदी सरकारचे मागच्या १० वर्षातील प्रभावी कार्य, मागच्या जाहीरनाम्यातील आश्वासनांची केलेली पूर्ती, विकसित भारताचा संकल्प सांगणाऱ्या यंदाच्या अंतरिम अर्थसंकल्पातील ठळक तरतुदी ही सर्व माहिती पोहोचण्याच्या उद्देशाने ‘गाव चलो अभियान’ हाती घेण्यात आले आहे. मोदीजींची गॅरंटी काय आहे हे प्रत्येक नागरिकापर्यंत पोहोचवण्यासाठी मागच्या १० वर्षातील मोदी सरकारच्या योजना व उल्लेखनीय कामगिरीची माहिती देणारी पत्रके वितरित करण्यात य़ेणार आहेत. शहरी भागात वॉर्ड निहाय हे अभियान राबविले जाईल. या अंतर्गत राज्यात ५० हजार युनिट्समध्ये भाजपाचे ५० हजार प्रवासी नेते, प्रत्येक मतदारापर्यंत पोहोचणार आहेत. पक्षाचे आजी व माजी खासदार, आमदार, जि.प सदस्य यांच्यासोबतच सर्व नेतेमंडळी जिल्ह्यातील प्रत्येक युनिटमध्ये प्रवास करतील व त्यांना सुपर वॉरियर्सचे देखील सहकार्य मिळेल, अशी माहिती आ.निलंगेकर यांनी दिली. प्रत्येक युनिटमध्ये भाजपाचा प्रवासी नेता एक दिवस मुक्काम करून, बुथ प्रमुखांच्या बैठका, नागरिकांच्या भेटी, नवमतदारांशी चर्चा अशी आखून दिलेली १८ संघटनात्मक कामे करेल, असेही माजीमंत्री आ.संभाजी पाटील निलंगेकर यांनी सांगितले .या अभियानात नव मतदारासह युवकांसाठी आयोजित नमो चषक क्रीडा स्पर्धेचे आयोजन होत असुन याद्वारे त्यांच्याशी संपर्क साधण्यात येणार आहे. तसेच महिलांसाठी शक्तीवंदन हा कार्यक्रम होणार असुन या कार्यक्रमात महिला बचत गटांच्या प्रतिनिधीशी पंतप्रधान नरेंद्र मोदी संवाद साधणार आहेत. नुकताच अंतिरम अर्थसंकल्प मांडण्यात आलेला असुन या संकल्पातील ठळक तरतुदीच्या माध्यमातून आगामी विकसित भारतचा अजेंडा जनतेसमोर ठेवत मोदीची गॅरंटी काय आहे आणि त्या गॅरंटीच्या माध्यमातून देशात जो बददल घडत आहे याबाबत सांगण्यात येणार असल्याचे माजीमंत्री आ.संभाजी पाटील निलंगेकर यांनी स्पष्ट केले.

## संपादकीय....

### अमेरिकी लोकशाहीची कसोटी

युद्धखोराला प्रोत्साहन व बळ आणि आंतरराष्ट्रीय आघाडीवर अमेरिकेची प्रतिमा स्वच्छ व प्रभावी राखण्यात आलेले अपयश यामुळे सत्ता राबवायची सगळी साधनसामुग्री हाती असतानाही बायडेन यांना ही निवडणूक सोपी नाही. त्यांच्यासमोर पुन्हा एकदा ट्रम्प यांचे आव्हान आहे.अमेरिकेच्या अध्यक्षीय पदाच्या निवडणुकीचे पडघम वाजायला सुरुवात झाली आहे. त्या निवडणुकीच्या प्राथमिक फेरीची धामधूम सुरू असून, तेथील उमेदवार कोणते मुद्दे हाती घेतात, हे बघणे औत्सुक्याचे आहे. निवडून आल्यानंतर याच मुद्द्यांचे धोरणात रूपांतर करून अमेरिकी अध्यक्ष जगाला कोणत्या वळणावर नेऊन ठेवणार हे समजणे जास्त आवश्यक आहे. त्यामुळे या निवडणुकीच्या पूर्वरंगाचा धावता आढावा घेणे क्रमप्राप्त ठरते.अध्यक्षाची निवड अमेरिकी जनता अप्रत्यक्षपणे करते. म्हणजेच, अमेरिकी जनता राज्यांमधून 'हाउस ऑफ रिप्रेझेंटेटिव्ह'चे सदस्य निवडते, त्याच्या संख्येच्या प्राबल्यावर निर्वाचन समिती नेमली जाते, जी अध्यक्ष निवडते. ही प्रक्रिया मुख्यत्वे द्विपक्षीय असते. कारण, तेथील पारंपरिक मतदार रिपब्लिकन अथवा डेमोक्रॅटिक पक्षाला मतदान करतो.याचे अंकगणित मांडताना, ५० घटक राज्य असलेल्या अमेरिकेत काही राज्ये या प्रमुख दोन पक्षांपैकी एकाला डोळे झाकून मतदान करतात. काही राज्ये मात्र आपला कौल कोणत्या पक्षाच्या पारड्यात टाकतील, या आधारे संपूर्ण निवडणुकीचं गणित मांडले जाते. 'स्विंग स्टेट्स' असे संबोधले जाणाऱ्या या राज्यांची संख्या सुमारे आठ ते बारा आहे. यात न्यू हॅम्पशायर, आयोवा आणि ओहायो या राज्यांचा समावेश असतो.नेता निवडीसाठी अत्यंत निर्णायक ठरणाऱ्या या राज्यांमध्ये म्हणूनच हे दोन पक्ष जास्त ताकद, पैसे आणि वेळ खर्च करतात. निवडणुकीच्या प्राथमिक टप्प्यात पक्षांतर्गत इच्छुक आपली दावेदारी सिद्ध करतात. निवडणुकीच्या पहिल्या फेरीत ढोबळ अर्थाने काही राज्यांमध्ये मतपेटीद्वारे अथवा काही राज्यांमध्ये हात उंचावून ही फेरी पार पडते.तीस 'प्रायमरी' वा 'कॉकूस' म्हणून संबोधतात. प्रत्येक राज्यातील पक्षाचे सभासद मतदान करून त्या पक्षाचे प्रतिनिधी निवडतात. ही प्रक्रिया काहीशी गुंतागुंतीची असते. पुढे पक्षाचा अधिकृत उमेदवार या प्रतिनिधी संख्येवर ठरवला जातो.डेमोक्रॅटिक पक्षाकडून विद्यमान अध्यक्ष जो बायडेन पुन्हा रिंगणात उतरले आहेत. त्यांनी अजून जाहीर केले नसले तरीही ते विद्यमान उपाध्यक्षा कमला हॅरिस यांना सोबत घेऊनच फेरनिवडणुकीला सामोरे जातील, असे दिसते. दुसरीकडे, रिपब्लिकन पक्षाकडून माजी अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प हे प्रमुख दावेदार मानले जातात. त्यांना स्पर्धा देणारे रॉन डिसॅन्टिस, विवेक रामास्वामी यांनी उमेदवारीवरचा आपला दावा विसरत ट्रम्प यांना समर्थन दिले आहे.आता निक्की हॅले या ट्रम्प यांच्या पक्षांतर्गत शेवटच्या स्पर्धक उरल्या आहेत. २०२०मध्ये बायडेन यांनी ट्रम्प यांचा पराभव केला होता. मात्र, बायडेन यांना ५१%, तर ट्रम्प यांना ४७% मतदान झाले होते. त्यामुळे, बायडेन यांचा तो विजय निर्विवाद ठरत नाही. याच ४७% प्रामुख्याने मूळ, श्वेतवर्णीय अमेरिकी मतदारांच्या पाठिंब्याच्या धुगधुगीवर ट्रम्प पक्षाच्या अधिकृत उमेदवारीवर दावा सांगत आहेत.बायडेन-हॅरिस यांचा पक्ष जसजसा डावे वळण घेत आहे त्याच प्रमाणात राष्ट्रवादी, उजव्या विचारसरणीच्या जनतेचा ट्रम्प यांना पाठिंबा वाढेल. बायडेन, ट्रम्प या दोघांनी वयाची पंचाहत्तरी पार केलेली आहे. त्यामुळे अमेरिकेचा नवा अध्यक्ष हा पुन्हा 'ज्येष्ठ' असणार आहे. तसेच, महिला अध्यक्षासाठी किमान चार वर्षांची वाट बघावी लागेल.बायडेन यांना निवडणूक अवघड कृष्णवर्णीय, आशियाई, आफ्रिकी, स्पॅनिश वंशाच्या लोकांचे हक्काचे मतदान डेमोक्रॅटिक पक्षाला होत आले आहे. तर, मूळ अमेरिकी नागरिक जो काही प्रमाणात पुराणमतवादी समजला जातो, तो रिपब्लिकन पक्षाचा पारंपरिक मतदार राहिला आहे. या दोन्ही विचारसरणीच्या जनतेने आणि त्यांच्या नेत्यांनी २०१७-१८पासून त्यांच्यातला वाद, विसंवाद आणि वर्गीकरण विकोपाला नेले.२०२०च्या निवडणुकीत दुभंगलेल्या अमेरिकेचे समोर आलेले चित्र आजही काही प्रमाणात तितकेच गडद आहे. त्यात, डेमोक्रॅटिक पक्षाने मध्यममार्गीय नेते सोडून कमला हॅरिस, बर्नी सँडर्स यांच्यासारख्या डावीकडे झुकलेल्या नेत्यांच्या शिडात हवा भरायला सुरुवात केल्यापासून विरोधी रिपब्लिकन पक्षाचा मतदार अधिक एकवटल्याचे चित्र आहे. हा मतदार आपल्या दैनंदिन असंतोषाला वाट करून देणारा प्रतिनिधी म्हणून ट्रम्प यांच्याकडे पाहतो.जनतेला संबोधित करायची रटाळ शैली, विसरभोळेपणा आणि ऐंशीच्या जवळ चाललेले वयोमान यांमुळे बायडेन आपली प्रशासनावर पकड दाखवू शकले नाहीत. ज्या कोरोना विषाणूच्या हाताळणीची सबब देत ट्रम्प यांना धारेवर धरण्यात आले त्याच कोरोनाने बायडेन यांच्या कार्यकाळात जास्त प्रमाणात डोके परत वर काढले होते. लस घ्यायच्या त्यांच्या आवाहनाला लोकांनी जुमानले नाही.त्यांनी अफगाणिस्तानमधून अमेरिकी सैन्य मायदेशी परत बोलावताना आपल्या लष्करी अधिकाऱ्यांशी, मित्र देशांशी सल्ला-मसलत केली नसल्याचे समोर आल्यानंतर त्यांची पार नाचक्की झाली होती. 'तीन महिन्यांत काबूल शहर तालिबानच्या हातात पडणार नाही', असे सांगणाऱ्या अमेरिकी यंत्रणांच्या डोळ्यांदेखत काबूल काही दिवसांत पडले.अमेरिकेच्या सर्वात जास्त काळ चाललेल्या युद्धाचा असा अपमानास्पद शेवट बायडेन यांच्या नेतृत्वात झाल्यामुळे त्यांच्यावर टीकेची मोठी झोड उठली. चीनच्या विरोधात लष्करी आघाडी उभी करताना अमेरिकेने अणूतंत्रज्ञान ऑस्ट्रेलियाला विकत, 'ऑकस' संघटना स्थापन केली. हे करताना ऑस्ट्रेलिया फ्रान्सकडून विकत घेणाऱ्या पाणबुड्यांचा करार जवळपास रद्द करण्यात आला. अंधारात ठेऊन केलेली ही घडामोड मित्रराष्ट्र फ्रान्सच्या जिव्हारी लागली.माजी अध्यक्ष जॉर्ज डब्ल्यू. बुश यांच्या आठ वर्षांच्या युद्धखोर राजवटीचा दाखला देत, 'रिपब्लिकन पक्ष युद्ध घडवून आणतो' असा प्रचार करून सत्तेत आलेल्या बायडन-हॅरिस जोडीने रशिया-युक्रेन, इस्त्राईल-हमास युद्धात आर्थिक, शस्त्रांची, लष्करी सल्लागारांची 'मदत' पाठवून, नागरिकांकडून कर स्वरूपात मिळालेल्या कोट्यवधी डॉलरचा चुराडा केला आहे.याउलट, ट्रम्प यांनी त्यांच्या कार्यकाळात एकही नवे युद्ध सुरू केले नव्हते. हा शिरस्ता 'आपण काटेकोरपणे पाळू' असे सांगून ट्रम्प बायडेन यांची अडचण करत आहेत. त्यामुळे, सत्ता राबवायची सगळी साधनसामुग्री हाती असतानाही बायडेन यांना ही निवडणूक सोपी ठरणार नाही.दर चार वर्षांनी होणारी ही निवडणूक उत्तरोत्तर रंग भरत जाते. प्राथमिक फेरीनंतर पक्षीय उमेदवाराची अधिकृत घोषणा आणि मग त्यांच्यात अर्थकारण, परराष्ट्र धोरण अशा महत्त्वाच्या विषयांवर जाहीर चर्चा घडवली जाते. या जाहीर चर्चेतील उमेदवारांचा पेहराव, त्यांची घोकलेली, चटपटीत उत्तरे हे आता नेहमीचेच, ठरलेले स्वरुप होऊ लागले आहे.

# निवडणूक घेण्याचा उद्देश काय?

लोकसभा निवडणुकी सोबतच अनेक राज्यात विधानसभा निवडणुक सुद्धा आहे. निवडणूक हि लोकशाही मध्ये अत्यंत महत्त्वाची प्रक्रिया असुन लोकशाही जिवंत ठेवण्यासाठी निवडणूक ही पारदर्शक, निष्पक्ष आणि निर्भिड होणे आवश्यक आहे. नागरिकांचा सर्वोत्तम अधिकार म्हणजे मताधिकारा द्वारा जनतेचे कोणते प्रतिनिधी सभागृहात पाठवायचे आणि कोणते भ्रष्ट, अकार्यक्षम आणि नितीहीन लोकांना दुर सारायचे हे सर्व जनता निवडणुकीच्या माध्यमातून ठरवत असते. जनतेची मते घेऊन निवडणूक जिंकता यावी म्हणून उमेदवारांना आपापल्या मतदार संघात चांगले काम करून जनकल्याणावर भर द्यावा लागतो. जनकल्याण या संकल्पनेत मुलभूत सुविधा सह आरोग्य, शिक्षण, रोजगार, महागाई नियंत्रण, शेतमालाला भाव, महिलांचे प्रश्न, मजुरांचे प्रश्न असे वेगवेगळे मुद्दे येत असतात. सरकारने जनकल्याचे काम करावे जर सरकार जनकल्याणाचे काम करत नसेल तर लोकप्रतीनीधी मार्फत समस्या सरकार दरबारी मांडल्या जातात आणि लोकप्रतिनिधी मार्फत सरकार कडून समस्या सोडवून घेतल्या जातात. जनता आणि सरकार यांच्या मधला दुवा म्हणजे लोकप्रतिनिधी असतो. लोकप्रतिनिधी किंवा सरकार जनकल्याणाचे काम करत नसेल तर ते काम करण्यासाठी दबाव, काम न केल्यास त्यांच्या कामावर संविधानीक मार्गाने टिका करण्याचा अधिकारही जनतेलाच आहे. लोककल्याणाचे काम होत नसतील तर आंदोलन, निदर्शने आणि सरकारच्या चुकीच्या धोरणाचा निषेध करण्याचाही अधिकार जनतेला आहे. जनता हि लोकशाही मध्ये सर्वश्रेष्ठ असुन जनतेच्या सेवेसाठी सर्व यंत्रणा काम करत असते. मताधिकार हा जेवढा लोकशाही मध्ये महत्त्वाचा घटक आहे तेवढाच अजून एक घटक महत्त्वाचा आहे तो म्हणजे बहूपक्षीय मान्यता. आपल्या देशात बहुपक्षीय लोकशाही आहे. याचे कारण असे की सत्ताधारी पक्षाने जनकल्याणाचे काम केले नाही तर दुसऱ्या पक्षाला सत्तेत जाण्याची संधी जनता देते. दुसऱ्या पक्षाचे जनकल्याणाचे काम केले नाही तर तिसऱ्या पक्षाला जनता सत्तेत जाण्याची संधी निर्माण करून देते. हे लोकशाही चे वैशिष्ट्य आहे. सत्ताधारी पक्षासोबत विरोधी ही पक्षही मजबूत असणे हे लोकशाही जिवंत असण्याचे लक्षण आहे. कारण सत्ताधारी पक्ष सत्तेचा गैरवापर करून जनकल्याणाच्या विरोधात काम करू नये, सरकारने योग्य व पारदर्शक कामे करून जनतेचे प्रश्न वेळेत सोडवण्यासाठी व त्यावर लक्ष ठेवून सत्ताधारी पक्षाकडून ते दबाव टाकून करून घेण्यासाठी विरोधी पक्ष मजबूत असणे आवश्यक असतो. सरकार ला प्रभावशाली काम करून जनकल्याण करून जनतेचा विश्वास व लोकशाही टिकवायची असेल भ्रष्टाचारी, व्याभिचारी नेत्यांवर वचक बसावा म्हणून स्वायत्त संस्था आहेत. स्वायत्त संस्थेच्या कामामध्‍ ये हस्तक्षेप करण्याचा सरकारला कोणताही अधिकार नाही. स्वायत्त संस्थांनी सरकारच्या दबावाखाली न येता प्रामाणिक काम केले तर देशातील भ्रष्टाचार, व्याभिचार आणि गुन्हेगारी दूर व्हायला वेळ लागत नाही. लोकांचे जिवन सोन्यासारखे बनवणारी लोकशाही धुर्त व विषमता वादी लोकांच्या तावडीत सापडली. आणि जे संविधान कामे लोकशाही व लोककल्याणाचे आहेत ते न होता विशिष्ट वर्गाला श्रीमंत करून, एकाच वर्णाची पुन्हा सत्ता प्रस्थापित करण्याचा प्रयत्न सुरू आहे. न्यायालयातील न्यायधीश रस्त्यावर येऊन पत्रकार परिषद घेऊन आम्हाला काम करू दिले जात नाही असे सांगत असतील तर सरकार किती खालच्या पातळीवर जाऊन लोकशाही नष्ट करायला लागले याची प्रचिती येते. जनकल्याणाचे काम होण्या ऐवजी जनतेला उद्धवस्त करण्याचे काम येथे होत आहे. जनता शिक्षण, रोजगार, आरोग्य सुविधेसह मुलभूत सुविधा मागणी करत असताना सरकार मंदिराचे भावनिक गाजर दाखवून वरिल मुद्यावर पडदा टाकुन मुद्दा च नसलेल्या मुद्याला समोर करत आहे. सरकारशी इमानदार राहून आपला स्वाभिमान राजकीय पक्षाच्या पायावर ठेवणारे प्रसारमाध्यमे श्रद्धेचे व धर्माचे भांडवल करून एकाच वर्णाच्या लोकांची झोळी भरून जनतेला मुर्खात काढत आहेत. धर्म ही वैयक्तिक बाब असुन तिला निवडणूक अजेंडा बनवून सार्वजनिक केले जात असेल तर हे लोकशाही साठी आणि लोकांच्या कल्याणासाठी घातक आहे. जनमताने सरकार निर्माण होत असते परंतु येथे इव्हिएमच्या माध्यमातून जनमत शुन्य करून लोकशाहीची हत्या सुरू आहे. राजकीय पक्षासह जनत आम्हाला इव्हिएम नको म्हणून देशभर करोडोच्या संख्येने रस्त्यावर उतरत आहे. निवडणूक हि जनतेला पाहिजे तशी होणे आवश्यक आहे. पक्षाच्या व सरकारच्या मताने निवडणूक होत नसते. जनता एव्हीएम विरोधात असताना सरकार इव्हिएमद्वारेच निवडणूक घेण्यासाठी आग्रही का असेल? अनेक जाणकार लोकांनी प्रात्यक्षिकाच्या माध्यमातून ईव्हीएम घोटाळा उघड केला. जेथे लोकांच्या मताची चोरी करून सरकार येत असेल तेथे लोकांची व लोकशाही ची कामे कशी होतील? निवडणूक कशी घ्यायची हा प्रश्न जनतेचा आहे. सरकारने जनमत लक्षात घेऊन कायदा करावा आणि निवडणूक आयोगाने सरकारच्या हस्तक्षेप विरहित पारदर्शक व विश्वासार्ह निवडणूक घ्यावी. परंतु येथे लोक निवडणूक आयोगा विरोधात आंदोलन मोर्चे करत असताना इव्हिएम विरोधात जे काही सामाजिक माध्यमांवर लोकांनी सामाईक केले आहे ते काढून टाकण्याचे आदेश देणे म्हणजे अभिव्यक्ती स्वांतत्र्याची गळचेपी करणे होय. अत्यंत महत्त्वाचा मुद्दा म्हणजे वाद हा निवडणूक आयोग आणि जनता यांचा असुन सरकार जनतेवर कडक कारवाई करण्याचे आदेश देत असेल तर सरळ सरळ आहे. इव्हिएमच्या माध्यमातून सरकार स्थापन होते. जनतेच्या मताची सरकार स्थापन करायला गरज नाही म्हणून सरकार इव्हिएम विरोधात बोलणाऱ्यावर कारवाई केली जाईल अशी भाषा बोलते. जर जनतेच्या मताची गरज सरकार स्थापनेसाठी लागली असती तर सरकारची जनतेवर कारवाई करा अशी बोलण्याची हिंमतच झाली नसती. सरकार विरोधात बोलणाऱ्यांना धर्मविरोधी म्हणून घोषित केले जाते. जातीय व धार्मिक तेढ निर्माण करून माणसाला अडचणीत टाकले जाते. सरकार विरोधात जास्तच बोलले लिहले तर तुरुंगात टाकले जाते. भ्रष्टाचारी नेत्यांना इडीची धमकी देऊन आपल्या पक्षात घेऊन त्याला भ्रष्टाचार मुक्त करून मंत्री बनवले जाते. जो पक्षात आला नाही त्याच्या वर वेगवेगळ्या माध्यमातून दबाव आणला जातो. जागतिक स्तरावर नाव लौकीक केलेल्या महिला सत्ताधारी खासदारावर लैंगिक शोषणाचा गुन्हा दाखल करतात तेव्हा खासदाराचे निलंबन करून कार्यवाही न करता जागतिक पातळीवरील देशाचे नाव गाजवलेल्या महिलांनाच बदनाम केले जाते. जागतिक पातळीवरील महिलांचे हे हाल असतील तर मनिपूर सारखे प्रकरण कितीतरी होत असतील. विरोधी पक्ष नष्ट करून पैसा, सत्तेची शक्ती या जोरावर विरोधी पक्षातील भ्रष्ट नेत्याची बोली लाऊन त्यांना श्रेष्ठ केले जाते. विद्यार्थी, शेतकरी, महिला न्यायासाठी रस्त्यावर उतरल्यातर त्यांच्या वरच अन्याय केला जातो. प्रसार माध्यमांना हाताशी धरून प्रसारमाध्यमांना पक्षाचे प्रवक्त्याचे काम दिले जाते. सर्वसामान्य व सरकार विरोधात बोलणाऱ्यांवर देशद्रोहाचे खटले भरले जातात तर देशाची दिशाभूल करणाऱ्यांना, देशाची गुप्त माहिती शत्रु देशाला देणाऱ्या खऱ्या देशद्रोही लोकांना पाठीशी घातले जाते. शिक्षण, रोजगार बंद करून शासकीय मालमत्तेचे खाजगीकरण केले जाते. आणि लोकांना आरक्षणासारख्या मुद्द्यांवर लढवले जाते. खाजगीकरणातुन, जुलमी करांतुन नोकरीभरती कपात करून, शैक्षणिक खर्च कमी करून, विदेशी लोन घेऊन मिळवलेला पैसा खर्च कुठे होतो हे विचारणे गुन्हा ठरत आहे. थोडक्यात देशात नागरिकांच्या मुलभूत हक्कांवर बंधने लादुन त्यांना दोषी ठरवण्यात येत आहे, न्याय हक्का साठी लढणाऱ्यांना नक्षलवादी आणि भ्रष्टाचार केलेल्या नेत्यांनी पक्ष प्रवेश केला तर त्यांना भ्रष्टाचार मुक्त करून जबाबदारी ची पदे दिली जातात. लोकशाही मोडकळीस काढणाऱ्यांना सत्तेत तर तर लोकशाही टिकवण्यासाठी लढा देणाऱ्यांना, इव्हिएमच्या विरोधात आंदोलन करणाऱ्यांना तुरुंगात टाकले जात आहे. इव्हिएम मध्ये घोटाळा करून, लोकशाही ची हत्या करून मोक्याच्या पदावर बसलेल्या लोकांना संरक्षण दिले जाते. धर्माच्या नावाखाली कर्म लपवून धर्माला बदनाम केले जाते. देशातील प्रत्येक क्षेत्रातील नागरिकांना सरकारच्या चुकीच्या धोरणाचा त्रास सहन करावा लागत असुन ही येणाऱ्या निवडणूका पारदर्शक व निष्पक्ष होणार नाही हे लहानातील लहान मुलही बोलायला लागली. इव्हिएम बणवणाऱ्या कंपनीच्या संचालक पदी सत्ताधारी लोकच नियुक्त होत असतील तर लोकांचा इव्हिएम व निवडणुकीवर विश्वास कसा निर्माण होईल? जर जनतेच्या मताला डावलून, लोकशाही ची हत्या करून निवडणूक आयोग निवडणूक घेत असेल तर ती निवडणूक घेण्याचा उद्देश तरी काय? अगोदरच कर्जाच्या ओझ्याखाली देश दबलेला आहे आणि इव्हिएमच्या माध्यमातून एकतर्फी निकाल द्यायचा आणि लोकांच्या मताची किंमत शुन्य करायची तर पुन्हा निवडणूक घेण्याच्या नाटकासाठी करोडो रुपये खर्च करण्याची गरजच काय? आज लोकशाही सह लोकांचे हक्क अधिकार धोक्यात आले आहेत याचे एकमेव कारण म्हणजे लोकांनी डॉ बाबासाहेब आंबेडकर व भारतीय संविधान कधी वाचलेच नाही. डॉ बाबासाहेब आंबेडकर व संविधान यांना एकाच धर्माची संपती समजून कायम विरोध करून मनातून तिरस्कार केला म्हणून आज हि परिस्थिती निर्माण झाली आहे. देशाला देशातील लोकांना पुन्हा एकदा सोन्याचे दिवस पाहिजे असतील तर डॉ बाबासाहेब आंबेडकर व संविधान समजून घेणे गरजेचे आहे. जोपर्यंत संविधान व डॉ बाबासाहेब आंबेडकर समजून घेणार नाही तो पर्यंत नागरिक हक्क अधिकारां बाबत जागृत होणार नाही. आणि लोकशाही मध्ये राजाच अर्थात जनताच जागृत नसेल तर तेथे लोकशाही ची हत्याच होणार. लोकशाहीचे जतन करण्यासाठी लोकशाही मध्ये नागरिक जागृत पाहिजे. परंतु लोकांना अज्ञानात व जाती धर्मात अडकवून राजकीय झोळी भरण्याच्या नादात लोकशाही धोक्यात आली आहे.

************

**विनोद पंजाबराव सदावर्ते**
**समाज एकता अभियान**
**रा. आरेगांव ता. मेहकर**
**मोबा: ९१३०९७९३००**

# धर्मांतर का केले? आणि सध्यस्थिती

आपण बौद्ध धम्म स्विकारून जवळ जवळ ७० वर्षे होत आली आहेत. ह्या दीर्घ काळात आपण धम्म किती समजून घेऊन, त्याचे पालन करतो ?, आपण नियमितपणे विहारात जातो का?, आपला धम्म कार्यात किती सहभाग असतो? आपण वर्षानुवर्षे लादलेल्या हिंदु धर्माच्या रुढी, परंपरा भिरकावून देऊ शकलो का? हे व असे कितीतरी प्रश्न नेहमीच विचारले जातात. परंतु डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या लाखो अनुयायांसह घेतलेली धम्म दीक्षा आणि त्यानंतरची स्थिती ह्यांची वस्तुनिष्ठ चर्चा होत नाही. म्हणुन हा लेखन प्रपंच.

सर्वप्रथम आपल्याला धर्मांतर पूर्व म्हणजेच १४ ऑक्टोबर १९५६ पूर्वीची सामाजिक स्थिती समजून घेणे आवश्यक आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरां चा मानव मुक्तीचा लढा ह्या देशातील तमाम अस्पृश्य समाजाला जाती व्यवस्थेच्या जाचक बंधनातून मुक्त करून सामाजिक समता प्रस्थापित करण्याच्या उद्देशाने लढला गेला. त्याचा फायदा सर्वांना झाला परंतु ह्या लढ्यात महार समाजाचा प्रमुख सहभाग असल्याचे दिसते.

ज्यावेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी बौद्ध धम्माची दीक्षा घेतली, तेव्हा महार समाजाची आर्थिक, शैक्षणिक, सामाजिक स्थिती कशी होती ?. त्यांना धर्मांतर का करावे लागले ? धम्मदीक्षा घेतल्यानंतर लागलीच बाबांचे झालेले महापरीनिर्वाण व त्यामुळे धम्म प्रसाराला बसलेली खीळ विचारात घेणे आवश्यक आहे.



महार समाज चातुर्वर्ण्य समाज व्यवस्थेत शूद्र म्हणुन गणला जातो. तो कायमच गावकुसाबाहेर फेकला जाऊन सत्ता, संपत्ती, सामाजिक स्थैर्य, शिक्षणापासून वंचित होता. चातुर्वर्ण्य समाज व्यवस्थेमध्ये त्याला स्वताचा व्यवसाय किंवा उद्योग नव्हता. त्यामुळे नाईलाजाने स्वताचे तसेच कुटुंबाच्या पोटाची खळगी भरण्यासाठी वाटेल ते पडेल काम करावे लागत असे. त्या वतनदारीच्या कामाला वेळ, काळाचे बंधन नव्हते. तसेच त्याच्या स्वरूपाला कुठल्याहीक्ष मर्यादा नव्हत्या. जी कामे इतर कुणी करीत नव्हते, ती सर्व पडेल कामे त्यांच्या माथी मारली जाते होती. ज्या ज्या वेळेला गावकीला गरज भासे, तेव्हा महाराला हक्काने बोलावले जाई. त्यावेळी घरात हजर असलेल्या कोणालाही, मग तो तरुण असो, वा म्हातारा ते बाई माणसापर्यंत कुणालाही ते काम करून देण्याचे बंधन होते. अगदी ओकारी येईल अशा अवस्थेतील कुजलेले मृत जनावर देखील ओढून नेऊन त्याची विल्हेवाट लावायची जबाबदारी त्याला पार पाडावी लागे. अगदी घरापासून ते माळराना पर्यंत राबताना आपली सावली कुणावर पडू नये ह्याची काळजी घेताना त्याची दमछाक होत असे. अशा किळसवाण्या परिस्थितीमुळे त्याला प्रश्न पडत असे की, आपण नक्की माणूसच आहोत ना ?, आपल्या स्पर्शाने किंवा सावलीने आपल्यासारखा हाडामांसाचा माणूस बाटतो कसा?आपल्याला जनावरांपेक्षा हीन वागणूक का मिळते ? आपण महार म्हणुन जन्माला आलो तो आपला गुन्हा आहे काय? अशा चहूकडून गांजलेल्या, मानसिक दृष्ट्या खचलेल्या कफल्लक समाजाला सामाजिक प्रतिष्ठा मिळावी. तसेच त्यांची शैक्षणिक, आर्थिक, सामाजिक उन्नती होऊन स्थैर्य प्राप्त व्हावे म्हणुन डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी हिंदू धर्मातील अनिष्ट प्रथा, परंपरांचा विरोध करीत मानव मुक्तीचा प्रखर लढा उभारला. ते काही धर्म विरोधी बंड नव्हते. तो फक्त मानवतेच्या हक्कांसाठी व्यक्त केलेला आक्रोश होता. परंतु तो ना देवाने ऐकला, ना धर्माने, ना त्याच्या बडव्यानी. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा व्यवस्थेला थेट प्रश्न होता की, जो धर्म अस्पृश्यांना देवळात जाऊ देत नाही. प्यायला पाणी मिळू देत नाही. विद्या ग्रहण करू देत नाही. अस्पृश्यांच्या सावलीचा ही विटाळ मानतो. त्या हिंदु धर्मात अस्पृश्यांनी का रहायचे? हिंदू धर्मात राहून अस्पृश्यांचा उद्धार होणार नाही.असे त्यांचे ठाम मत झाल्यामुळे, शेवटी कंटाळून मानवी हक्कांच्या संवर्धनासाठी हिंदु धर्माचा त्याग करून, नागपूरच्या दीक्षा भूमिवर भगवान बुद्धाचा जीवनमार्ग लोककल्याणाचा सदाचार,समता, स्वातंत्र्य, बंधूतेचा वाटल्यामुळे बौद्ध धम्माचा स्विकार केला.

धर्माचा संबंध देवाशी आहे तर धम्माचा संबंध मानवाशी आहे. धर्म बुद्धीप्रामाण्य नाकारतो तर धम्म बुद्धीप्रामाण्य मानतो. धर्म म्हणजे बंधन तर धम्म म्हणजे स्वातंत्र्य.

नागपूरच्या धम्म दीक्षा कार्यक्रमानंतर बाबांनी पुढील काळात अशा प्रकारे अनेक दीक्षा मेळावे आणि धम्म प्रसाराचे कार्यक्रम नियोजित केले होते. परंतु लवकरच त्यांचे ६ डिसेंबर १९५६ ला अचानक महापरीनिर्वाण झाले. त्यामुळे धम्म प्रसारासाठीच्या पुढील योजना कार्यान्वित होऊ शकल्या नाहीत. नंतरच्या काळात त्यांच्या राजकिय वारसांमध्ये नेतृत्व स्पर्धा निर्माण होऊन त्यांचे अनेक गट निर्माण झाले. त्या नादात धम्म प्रसाराकडे सगळ्यांचे दुर्लक्ष झाले.

मुळात धर्म म्हणजे काय? विविध धर्मांची आणि पंथाच्या निर्मितीची गरज का भासली? माणूस रानटी अवस्थेपासून इतरांसारखा हिंस्र पशु होता. परंतु त्याला उपजत बुद्धिमत्तेची देणगी मिळाल्यामुळे तो विकसित होत गेला. त्यानेच माणसाच्या आयुष्यात सुख, परस्पर प्रेम, शांतता, आणि समाधान लाभावे म्हणुन आचरणात आणण्याची जीवन पद्धती निर्माण केली आणि त्याला नाव दिले धर्म आणि पंथ. त्यामुळे आतापर्यंत माणसात सुधारणा होत जाऊन सूर्याला गवसणी घालण्याच्या अवस्थेपर्यंत त्याने प्रगती केली आहे. इतका प्रगत होऊन देखील माणसातील हिंस्र वृत्तीचे दर्शन अधूनमधून होतांना दिसतेच.

माणसाला धर्म आणि त्यातील स्थान, हे जन्माने मिळते. तिथले संस्कार होऊन, त्याची पुढील वाटचाल निश्चित होते. आपल्या बाबतीत परिस्थिती एकदम वेगळी होती. आपण अशा धर्माला बांधिल होतो की, त्यातील देव दर्शनाला मज्जाव होता.आपल्या सावलीने माणसं तर बाटत होतीच पण देवाला देखील आपली सावली चालत नव्हती. त्या अर्थाने आपल्याला धर्मच नव्हता. तर संस्कार कुठून येणार? जे काही होते, ते फक्त अज्ञान ,गरिबी, त्यामुळे आलेली लाचारी, आणि आपण त्याच अवस्थेत खितपत पडावे म्हणुन आपल्यावर लादलेले प्रचंड अंधश्रद्धांचे डोंगर आणि धर्माची भीती. अशा अवस्थेत बाबांनी सर्वांना घेऊन धर्मांतर केले.

बाबांच्या महापरिनिर्वाणा नंतर नेतृत्वासाठीच्या साठमारीत धम्म कार्य ठप्प झाले होते. परंतु महाउपासिका आदरणीय मीराताई आंबेडकर भारतीय बौद्ध महासभेच्या अध्यक्ष झाल्यानंतर खर्या अर्थाने धम्म प्रसार सुरू झाला. त्यांनी अतिशय कष्टपूर्वक, जिद्दीने, चिकाटीने आणि शिस्तपूर्वक बौद्ध महासभेची बांधणी केली. सध्या धम्म चळवळीने जो वेग घेतल्याचे दिसते, त्यामागे त्यांचा त्याग, शिस्त, दूरदृष्टी, आणि झोकून देऊन काम करण्याची वृत्ती आहे. त्यांच्या कर्तृत्वामुळे संपूर्ण देशात भारतीय बौद्ध महासभेचे जाळे पसरल्याचे दिसते.

ह्या सर्व परिस्थितीचा सांगोपांग विचार करून भूतकाळातील घटनांकडे दुर्लक्ष करून , देर सेआये, दुरुस्त आये या विचाराने भविष्यात धम्म कार्याला बळकटी देण्याच्या दृष्टीने वाटचाल करणे आवश्यक आहे. धम्म प्रसार कार्याला आर्थिक सहकार्याची सगळ्यात जास्त आवश्यकता असते. त्यासाठी समाजातील धनवान लोकांनी पुढे आले पाहिजे त्याचप्रमाणे सर्वसाधारण बौद्ध धम्मीयांनी देखील कर्तव्य बुद्धीने सहभाग नोंदविणे गरजेचे आहे.

त्यासाठी आपण स्वतःला काही बंधने घालून घेतली पाहिजे. सर्वप्रथम राजकारण आणि धम्म कार्य ह्यांची सरमिसळ करणे बंद करणे आवश्यक आहे. कारण राजकारणी धम्म कार्य करू शकत नाही आणि धम्म कार्य करणाऱ्याला राजकारण करता येत नाही. हे दोन्ही मार्ग अतिशय भिन्न असून, त्याची सरमिसळ झाल्यास, कोणतेही कार्य पूर्णांशाने सफल होऊ शकत नाही. त्यामुळे राजकारण्यांनी राजकारण करावे आणि धम्म कार्य करणार्यांनी राजकारणात येऊ नये. कुणीही एकमेकांच्या कामात लुडबुड करू नये. आपले बौद्धाचार्य धम्माभ्यासात पारंगत असून त्यांचे आचरण देखील धम्मपुरक आहे. परंतु त्यांना धम्मज्ञानात अधिक प्रशिक्षित करणे गरजेचे आहे. त्यासाठी आपल्याला मोठ्या प्रमाणात विहारांची निर्मिती करून नियमित धम्म साधना करावी लागेल. बाल्यावस्थेपासून मुलांवर धम्म संस्कार केल्यास त्याचा भविष्यात खूप फायदा होऊन धम्मचक्र गतीने फिरण्यास मदत होईल. भिक्खूगण कधीतरी दिसतात किंवा प्रवचनाच्या कार्यक्रमात भेटतात. भिख्खू गणांची संख्या अल्प असून त्यांच्या मध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झाली पाहिजे.

एक गोष्ट आपण सहज करू शकतो ती म्हणजे आपल्यामध्ये विविध गुण असलेले सेवानिवृत्त लोक आहेत. त्यांच्या अनुभवाचा, ज्ञानाचा, आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे त्यांच्याकडे असलेल्या वेळेचा धम्म कार्यासाठी चांगला सदुपयोग होऊ शकतो. त्या दृष्टीने काही योजना निश्चित आखता येऊन कार्यान्वित करता येतील. वाटबिकट,खडतर,जिकिरीचीआहे.परंतुताउनसुलाखूननिघाल्या शिवाय दागिना घडत नाही. हे आपण विसरून चालणार नाही.

तूर्त आपण एव्हढे जरी करू शकलो तरी, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या मी भारत बौद्धमय करील. या स्वप्नाच्या दिशेने एक पाउल पुढे टाकल्याचे पुण्य आपल्याला निश्चित मिळेल.

************

**अरूण निकम.**
**९३२३२४९४८७.**
**मुंबई.**

# प्रा. डॉ. विश्वनाथ कराड यांचा वाढदिवस विविध सामाजिक उपक्रमांनी साजरा

# दंत आरोग्य, फिजिओथेरपी उपचार शिबिरात ३८१ रुग्णांवर मोफत उपचार

लातूर : – माईर्स एमआयटी पुणेचे संस्थापक – अध्यक्ष प्रा. डॉ. विश्वनाथ दा. कराड यांचा ८३ वा वाढदिवस विविध सामाजिक उपक्रम घेवून साजरा करण्यात आला. डॉ. कराड यांच्या वाढदिवसानिमित्त घेण्यात आलेल्या दंत आरोग्य शिबिरात २४० रुग्णांची व फिजीओथेरपी उपचार शिबिरात १६२ रुग्णांची तपासणी करुन उपचार करण्यात आले. त्याचबरोबर अनेक गरजू ज्येष्ठ नागरीक रुग्णांना संपूर्ण दातांची कवळी वाटप करण्यात आली. एमआयडीएसआर दंत रुग्णालयाच्या वतीने लातूर तालुक्यातील हरंगुळ (खु.) व रूई रामेश्वर येथे मोफत दंत आरोग्य तपासणी शिबिर घेण्यात आले. या शिबिरात दंत रोग तज्ज्ञांकडून मुख व दंत रोग, हिरड्या व त्यासबंधी आजार, दातांना लागलेली किड, वेडेवाकडे दात अशा २४० रुग्णांची दंत रोग तपासणी करुन प्राथमिक उपचार करण्यात आले. तसेच दातांची निगा कशी राखावी, दंत रोग होऊच नये यासाठी प्रतिबंधात्मक उपाय, अपघातानंतर दातांची घ्यावयाची काळजी, दंत रोग जडल्यानंतर घ्यावयाचे उपचार याविषयी डॉ. प्रकाश कसबे व डॉ. नेहल पवार यांनी माहिती दिली. तसेच एमआयडीएसआर दंत रुग्णालयात वाढदिवसानिमित्त विविध उपक्रम घेण्यात आले. यामध्ये कृत्रिम दंत रोपण विभागाच्या वतीने अनेक गरजू ज्येष्ठ नागरीक रुग्णांना संपूर्ण दातांची कवळी वाटप करुन त्याचा वापर, स्वच्छता व दात नसलेल्या रुग्णांसाठी





उपलब्ध विविध उपचार पध्दती या विषयी माहिती देवून दातांबरोबर निरोगी हिरड्याचेही महत्व सामजावून सांगण्यात आले. तसेच दंत रुग्णालयातील सार्वजनिक दंत आरोग्य विभागांतर्गत कार्यरत असलेल्या तंबाखु सेसेशन सेंटर येथे रूग्णांसाठी कार्बन मोनोऑक्साईड मॉनिटरचे उद्घाटन उप प्राचार्य डॉ. यतीशकुमार जोशी यांच्या हस्ते फित कापून करण्यात आले. हे उपकरण तंबाखुजन्य व्यसनांची सवय सोडवण्यास मदत करते. त्याचबरोबर एमआयटी परिसरात पर्यावरण संवर्धनासाठी डॉ. यतीशकुमार जोशी व अन्य कर्मचाऱ्यांच्या हस्ते वृक्षारोपन करण्यात आले. वाढदिवसानिमित्त एमआयडीएसआर दंत महाविद्यालयात येथे आयोजित कार्यक्रमात सन २०२३ या वर्षात सर्वोत्तम कामगीरी केल्याबद्द्ल बाल दंत आरोग्य विभागास 'बेस्ट परफॉर्मस् अवॉर्ड ऑफ द इयर' हा अवार्ड उप प्राचार्य डॉ. यतीशकुमार जोशी यांच्या हस्ते बाल दंत रोग तज्ज्ञ डॉ. श्रीकांत केंद्रे व त्यांच्या सहकाऱ्यांना सन्मानचषक देऊन अवॉर्ड देण्यात आला. तसेच चित्रकला स्पर्धेत प्रा. डॉ. विश्वनाथ कराड सर यांचे उत्कृष्ठ चित्र रेखाटल्याबद्द्ल डॉ. भाग्यश्री चव्हाण यांना प्रथम पारितोषिक देण्यात आले. यावेळी विभाग प्रमुख डॉ. सिराज बादल, डॉ. अश्विनी बिरादार, डॉ. विजयालक्ष्मी माले, डॉ. गौरी उगले, डॉ. प्रविण मरूरे, डॉ. शिरिष पवार, डॉ. वर्षा सांगळे, डॉ. अभषेक बादाडे, डॉ. मधुरा अग्रवाल, डॉ. शितल वाघ, डॉ. अर्चना आपटे, डॉ. सोनाली भराडीया, डॉ. सरस्वती बंदखडके, डॉ. सुजित झाडके, डॉ. स्नेहा चोले, डॉ. गोपाळ नागरगोजे, विद्या बायबसे, डॉ. योगेश नागरगोजे, डॉ. तृप्ती गिरी, डॉ. रोहिणी दिवेकर, डॉ. मिथिला काकडे, कार्यालय अधिक्षक बळीराम हांडगे, श्रीधर घुले आदी उपस्थित होते. डॉ. कराड यांच्या वाढदिवसानिमित्त एमआयपी फिजीओथेरपी महाविद्यालय येथे मोफत फिजिओथेरपी उपचार शिबिर घेण्यात आले. या शिबिरात मानदुखी, पाठदुखी, कंबरदुखी, खांदादुखी, मणक्याचे आजार, गुडघेदुखी, सांधेदुखी, संधीवात, हातापायांना मुंग्या येणे, मार लागलेले खेळाडू अशा विविध आजारांच्या १६२ रुग्णांवर फिजिओथेरपी तज्ज्ञांकडून विविध प्रकारचे फिजिओथेरपी उपचार करण्यात आले. त्याचबरोबर दैनंदिन जीवनातील कामाची, बसण्याची योग्य पद्धत, निरोगी जिवनशैली या विषयी उपस्थित रूग्णांना माहिती देण्यात आली. त्याचबरोबर उपस्थित रूग्ण व नातेवाईक यांना फळ वाटप करण्यात आले. या शिबिरास प्राचार्या डॉ. सुभाष खत्री, डॉ. गौरव भटनागर, डॉ. विश्वनाथ पावडशेट्टी, डॉ. शितल घुले, डॉ. मोहम्म्द झिशान, डॉ. सलीम शेख, डॉ. अनिल साठे यांनी सेवा बजावली.

# एमआयटीच्या ग्रामीण रुग्णालयात विविध उपक्रम राबवून ज्येष्ठ शिक्षणतज्ञ डॉ. वि. दा. कराड यांचा जन्मदिन साजरा

लातूर :– ज्येष्ठ शिक्षण तज्ञ पुणे येथील माईर्स एमआयटी विश्वशांती विद्यापीठाचे संस्थापक अध्यक्ष विश्वधर्मी प्रा. डॉ. विश्वनाथजी कराड यांच्या जन्मदिनानिमित्ताने ३ फेब्रुवारी शनिवार रोजी लातूर येथील एमआयटीच्या यशवंतराव चव्हाण ग्रामीण रुग्णालयात कार्यकारी संचालक आ. रमेशआप्पा कराड यांच्या मार्गदर्शनाखाली विविध आजाराच्या रुग्णांची तपासणी त्यांचे उपचार, रक्तदान, फळवाटप यासह विविध उपक्रम राबवण्यात आले.






जगातील सर्वात मोठ्या घुमटाची संकल्पना निर्मिती करून भारत मातेच्या विश्वशांती आणि मानवतेचा संदेश जगभर पोहोचविणारे ज्येष्ठ शिक्षण तज्ञ विश्वधर्मी प्रा. डॉ. विश्वनाथजी कराड यांच्या जन्मदिनानिमित्त लातूर येथील यशवंतराव चव्हाण ग्रामीण रुग्णालयात कार्यकारी संचालक आ. रमेशआप्पा कराड यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आलेल्या विविध उपक्रमाचा शुभारंभ लातूर एमआयटी परिसर समन्वयक पृथ्वीराज रमेशआप्पा कराड, शैक्षणिक व प्रशासकीय संचालिका डॉ. सरिता मंत्री, प्रा. डॉ. बबन आडगावकर, प्रा. डॉ. चंद्रकला पाटील, डॉ. क्रांती केंद्रे, डॉ. विद्या कांदे, डॉ. शैला बांगड, डॉ. कुलकर्णी, डॉ. सोनवणे, डॉ. शिल्पा दडगे, प्रशासकीय अधिकारी मधुकर गुट्टे, रुग्णालय प्रशासकीय अधिकारी श्रीपती मुंडे, मारुती हत्ते यांच्यासह अनेकांची प्रमुख उपस्थिती होती.

यशवंतराव चव्हाण ग्रामीण रुग्णालय येथील सरस्वती कराड ब्लड बँकेत आयोजित करण्यात आलेल्या रक्तदान शिबिरात तब्बल ८३ जणांनी रक्तदान केले. स्त्रीरोग विभागामार्फत १४५ महिलांची स्तन व गर्भाशयाच्या कॅन्सरची तपासणी करून त्यांच्यावर उपचार करण्यात आले. बालरोग विभागामार्फत थॅलेसिमिया ३२ रुग्णांचे मोफत सिरम फेरेटिन तपासणी करण्यात आली. कान नाक घसा विभागामार्फत ७० रुग्णांचे मोफत श्रवण क्षमता तपासण्यात आली. यशवंतराव चव्हाण ग्रामीण रुग्णालयात दाखल असलेल्या सर्व रुग्णांना फळांचे मोठ्या प्रमाणात वाटप करण्यात आले. विविध विभागामार्फत घेण्यात आलेल्या सर्वच उपक्रमांना रुग्णांनी आणि त्यांच्या नातेवाईकांनी मोठा प्रतिसाद दिला याप्रसंगी रुग्णालयातील अधिकारी, कर्मचारी यांनी मेहनत घेतली.

# राज्यात कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न गंभीर

मुंबई : काल उल्हासनगरमध्ये भाजपचे आमदार गणपत गायकवाड यांनी शिवसेना शिंदे गटाचे नेते महेश गायकवाड यांच्यावर पोलीस ठाण्यातच गोळीबार केल्याची घटना समोर आली. या घटनेमुळे खळबळ उडाली. जखमींवर ठाण्यातील रुग्णालयात उपचार सुरू आहेत, यावरुन आता राजकीय वर्तुळात आरोप–प्रत्यारोप सुरू आहेत. राष्ट्रवादी शरद पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनीही राज्य सरकारवर टीका केली.कालची घटना निषेधार्य आहे. सरकार आणि गुंडांच्यामध्ये अंतर कमी झाले आहे. गुंडगीरीला प्रोत्साहन दिले जात आहे. भारतीय जनता पक्षाचे आमदारच तसं सांगत आहेत. गोळ्या झाडल्याचे ते आमदाराच सांगत आहेत. पोलीस ठाण्यातच असा गोळीबार होतोय म्हणजे कायदा व सुव्यवस्था वेशीवर टांगली आहे, असं सध्या महाराष्ट्र चित्र आहे. अशी घटना आपल्या राज्यात आजपर्यंत कधी झालेली नव्हती ती आज झाली आहे, असा टोला जयंत पाटील यांनी राज्य सरकारला लगावला.



# सुशिक्षित नोकरदार, डॉक्टर, इंजिनियर संविधान हातातही घेत नाहीत आणि खेड्यातील माऊली

नायगाव (ता.खंडाळा) जवळच्या पळशी गावातील अनुसया कांबळे (वय ६८) यांचा कधी परिचय होईल अशी शक्यता नव्हती. तरीही भेट झाली. बोलणे झाले. परिचय झाला. आणि ज्या मायमाऊलीविषयी अभिमान वाटावा अशी स्त्री भेटल्याने काळीज सुपाएवढं होण्याचा आनंद मिळाला. क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त ०३ जानेवारी, २०२४ रोजी त्यांच्या जन्मगावी नायगाव येथे पुस्तकांचा स्टॉल मांडलेला होता. अनेक लोक सावित्रीमाईंना अभिवादन करण्यासाठी येत होते. येता जाता स्टॉलवरील पुस्तक चाळत होते. अशातच वृद्धापकाळाकडे झुकलेल्या कष्टकरी अनुसयाबाई पुस्तकांच्या स्टॉलजवळ आल्या. त्यांच्या पायात स्लीपर, हातात काळ्या रंगाची पिशवी होती. त्यांची नजर बराच वेळ पुस्तकांवर फिरत राहिली. न राहून मी त्यांना विचारले, कोणतं पुस्तक हवं आहे काय? त्या म्हणाल्या, बाबासाहेबाचं संविधान हाय का? माझ्या चेहऱ्यावर स्मित उमटलं. मी त्यांना भारतीय संविधान हा ग्रंथ दाखविला. संविधान हातात घेऊन त्यावरून अलगद मायेचा हात फिरवताना त्या मायमाऊलीच्या चेहऱ्यावर विलक्षण समाधान दिसत होते. एखादी अनमोल वस्तू हातात मिळावी आणि अत्यंत प्रेमाने ती घट्ट धरून ठेवावी, त्या वस्तूला स्पर्श करण्याचे सुख अनुभवावे, मनात आनंद आणि अभिमान दाटून यावा, तसे काहीसे त्या माऊलीच्या चेहऱ्यावर दिसत होते. त्या माऊलीने ते संविधान आत बाहेर पुन्हा पुन्हा पाने उलटून पाहिले. चाळले, स्पर्शले आणि शेवटी त्या म्हणाल्या, किती रुपयं पडत्याल? मी म्हणालो, चारशे. त्यांच्यासोबत असणारी जोडीदारीन मध्येच म्हणाली, काही कमी करा की... मी काही बोलणार इतक्यात अनुसयाबाई म्हणाल्या, ये गप ग! हे पुस्तक किती मोठं हाय तुला माहीत नाय. या पुस्तकाचा भावमोल करायचा नसतोय. असे म्हणत तिने स्वतः जवळच्या छोट्या बटव्यातून गुंडाळ्या गुंडाळ्या करून ठेवलेल्या नोटा काढल्या. नोटा सरळ करून माझ्याकडे देत म्हणाल्या, हे घ्या. काय सुद्धा कमी करू नका बघा. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांबद्दल असणारा आदर, अभिमान आणि भारतीय संविधानावर असणारी निष्ठा यांचे वेगळेच अनुभवचित्र माझ्या नजरेसमोर दिसत होते. मी त्यांना मा. हरी नरके लिखित 'ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले' हे पुस्तक भेट म्हणून दिले. पुढे मी उत्सुकतेने विचारले, मावशी, तुम्हाला वाचता येते का? त्या म्हणाल्या, माझी शाळा झाली न्हाई. मी म्हणालो, मग मुलासाठी घेतला का हे पुस्तक? त्या म्हणाल्या, त्यो कुठला वाचतुय. त्याचं त्याला काम संपंना. मी म्हणालो, हे पुस्तक वाचणार कोण मग? त्या म्हणाल्या, माझी दोन नातवंड शाळेत हाईत. त्यामधलं एक चौथीला आणि एक सातवीला हाय. उद्या ती मोठी होतीली आणि तीच हे पुस्तक वाचतील. आम्हालाबी चार शब्द समजून सांगत्याल. हे पुस्तक वाचल्याशिवाय त्यांच्याबी जीवनाला वळण लागणार हाय व्हय? मी अक्षरशः त्या मायमाऊलीच्या भावनेसमोर नतमस्तक झालो. माझ्या डोळ्यात नकळत पाणी उभारलं. एक दिवसाचा रोजगार बुडवून ज्ञानज्योती सावित्रीबाई फुलेंना वंदन करायला आलेली ही माऊली! त्यांची परवानगी घेऊन मी काही फोटो घेतले. आजही अनेक सुशिक्षित नोकरदार, डॉक्टर, इंजिनियर संविधान हातातही घेत नाहीत. अजून अनेकांना भारतीय संविधानाचे मोल कळलेले नाही. ज्यांना भारतीय संविधानाचे मोल कळले आहे, ते मात्र असा एक नवा धडा घालून देतात. संविधानातला भारत निर्मितीसाठी हा आदर्श प्रत्येकाने जोपासायला काय हरकत आहे?



# आमदार शेखर निकम यांच्या पाठपुराव्याने अखेर तब्बल २० वर्षे रखडलेला कुडप धरण प्रश्न मार्गी

चिपळूण / प्रतिनीधी: गेल्या २० वर्षापासून रखडलेल्या कुडप धरणाया बुडीत क्षेत्रात हद्द बदलण्याचा प्रश्न अखेर आमदार शेखर निकम यांच्या पाठपुराव्याने अखेर मार्गी लागला आहे. ग्रामस्थांच्या मागणीनुसार बुडीत क्षेत्रातील हद्द पुंभारवाडीच्या वरच्या बाजूस स्थलांतरीत करणेबाबत निर्णय झाल्यानंतर जलसंपदा कार्यकारी सालक अतुल कपाले यांनी आमदार निकम यीं भेट घेऊन बदललेल्या हद्दीाााी पाहणी केली. यामुळे तब्बल ४० कोटी खर्च धरण उभारणा प्रश्न निकालात निघाला असून लवकरात लवकर कामालाही सुरूवात होणार आहे.



कुडप येथे धरण बांधण्याची मागणी ही पूर्वीपासूनच आहे. २००४ मध्ये या धरणाला प्रशासकीय प्रशासकीय मान्यता मिळाली. मात्र धरणाया बुडीत क्षेत्रात गावी जास्तीत जास्त भातशेती बाधित होत असल्याने त्या हद्द ही पुंभारवाडी जवळ बदलून मिळावी अशी मागणी ग्रामस्थांनी करत होते. त्यानंतर झालेल्या विरोधामुळे धरण काम रखडले होते. पुढे आमदार शेखर निकम यांनी या धरण प्रश्नात लक्ष घातले. त्यानी केलेल्या सततच्या पाठपुराव्यामुळे धरणी हद्द स्थलांतरीत करण्याचा निर्णय झाला. आता ग्रामस्थांच्या मागणीनुसार धरण बुडीत क्षेत्रात हद्द पुंभारवाडीच्या वरच्या बाजूस नेण्यात आली आहे.

गेल्या अनेक वर्षा प्रश्न निकालात निघाल्यानंतर शनिवारी जलसंपदाचे कार्यकारी संचालक अतुल कपोले, मुख्य अभियंता मिलींद नाईक, अधिक्षक अभियंता महेश सुर्वे, कार्यकारी अभियंता विवेक सोनार, कार्यकारी अभियंता गणेश सलगर, उप विभागिय अभियंता विपुल खोत आदीनी सावर्डे येथे आमदार निकम यांची भेट घेऊन या धरण बांधकामासंदर्भात सकारात्मक केली. त्यानंतर स्थलांतरीत करण्यात आलेल्या हद्दीत या वरीष्ठ अधिकाऱ्यांकडून पाहणी केली.

# डॉ. विश्वनाथ कराड चालते बोलते विद्यापीठ

विश्वधर्मी प्रा. डॉ. वि.दा. कराड यांचे आज ३ फेब्रुवारी २०२४ रोजी वयाच्या ८४ व्या वर्षात पदार्पण होत आहे. शेतकरी कुटुंबातून आलेल्या प्राध्यापक कराड सरांचा जागतिक दर्जाच्या विद्यापीठाच्या स्थापनेपर्यंतचा प्रवास अद्भुत आणि प्रेरणादायक आहे. भारत मातेचा चेहरा बदलणारे व भारत हा विश्वगुरू होणार या स्वामी विवेकानंदांना अभिप्रेत असणारे युवक ही संस्था गेली ४० वर्ष घडवित आली आहे. अशा वेळेस त्यांच्या बहुगुणांचे पैलू बघणे अत्यंत महत्त्वाचे आहे. अमेरिकेतील चार जगप्रसिद्ध विद्यापीठांनी एकत्र येऊन प्रा. डॉ. विश्वनाथ दा कराड यांचा पुतळा उभारून त्यांच्या कार्याचा, त्यांच्या आदर्श शिक्षकाचा, त्यांनी निर्माण केलेल्या असंख्य संस्था, तेराहून अधिक मंदिरे व सर्वधर्मसमभावाच्या न्यायाप्रमाणे विविध धर्मांचे ज्ञानस्थळ उभ्या करण्याचा त्यांच्या या कार्याचा सन्मान केला आहे. याच संदर्भात एमआयटी वर्ल्ड पीस यूनिवर्सिटी चे प्र कुलगुरू प्रा. डॉ. मिलिंद पांडे यांचा हा विस्तृत लेख–विश्वधर्मी प्रा. डॉ. विश्वनाथ दा कराड हे आज रोजी ८४ व्या वर्षात पदार्पण करत आहे. त्यांनी खडतर प्रवास करून अभियांत्रिकीच्या विद्यार्थी दशेपासून अभियांत्रिकीचे प्राध्यापक व त्यानंतर जागतिक दर्जाच्या पाच विद्यापीठांच्या स्थापनेपर्यंतचा त्यांचा प्रवास हा प्रेरणादायी आहे, अद्भुत आहे व असामान्य आहे. महाराष्ट्राच्या शैक्षणिक , सांस्कृतिक सामाजिक आणि अध्यात्मिक या चारही क्षेत्रात मोठे योगदान असलेले व स्वकर्तृत्वावर मूल्याधिष्ठित शिक्षण क्षेत्रात स्वतःचा वेगळा ठसा उमटवणारे, अमेरिकेच्या सॉल्ट लेक या शहरात झालेल्या धर्म परिषदेत, सात हजाराच्या वर उपस्थित मान्यवरांमध्ये आणि स्वामी विवेकानंद ज्या धर्म परिषदेत बोलले होते अशाच एका धर्म परिषदेत आपले विचार व्यक्त करून जगातील इतर देशातून आलेल्या धर्मगुरू विचारवंत व शोते यांच्याकडून टाळ्यांचा कडकडाट मिळवणारे, आदरणीय व्यक्तिमत्व म्हणजे प्रा. डॉ. विश्वनाथ कराड सर हे एक चालते बोलते विद्यापीठ आहेत. सर्वोत्कृष्ट गुणवत्ता आणि व्यापकता , सर्व संकल्पना व कार्य प्रणालीत प्रतिबिंबित होणारे त्यांचे विचार, मूल्याधिष्ठित शिक्षणासाठी त्यांनी उभारलेले विद्यापीठे तसेच एमआयटी समूहाच्या विविध इमारती किंवा लोणी काळभोर राजबाग येथे उभारलेला तत्त्वज्ञ संत ज्ञानेश्वर महाराज व तुकाराम महाराज यांच्या नावाने असलेला जगातील सर्वात मोठा घुमट– त्यालाच अध्यात्मिक शास्त्राची वैज्ञानिक प्रयोगशाळा असे म्हटलेल आहे या व्यतिरिक्त विविध वर्ल्ड पार्लमेंट असो तांत्रिक कार्यक्रम असो इंडोमेंट लेक्चर सिरीज असो किंबहुना योग– योगासन, सामूहिक प्रार्थना , ध्यानधारणा याचा गेल्या ४० वर्षापासून प्रत्यक्षात राबविण्याचा मापदंड त्यांनी




स्थापित केला .स्वामी विवेकानंद व ज्ञानोबा तुकाराम यांच्या विचारांचे प्रतिबिंब त्यांच्या प्रणालीत त्यांच्या कार्यात नेहमीच आढळून येते. विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षणासह शिस्त, व्यक्तिमत्त्व विकास, भारतीय मूल्याधारित शिक्षण पद्धती यांचा ध्यास त्यांनी घेतला आणि शिक्षण क्षेत्रास एक नवी व निर्णायक दिशा प्राप्त झाली. इंद्रायणी नदीकाठी ८४ फूट पडदा बसवून तीर्थक्षेत्र हेच ज्ञान तीर्थक्षेत्र आहेत या उद्देशाने जगातील सर्व तीर्थक्षेत्रांचा कायापालट व्हावा असा ध्यास त्यांनी घेतला. ज्ञानभूमीतून देवभूमीकडे या संकल्पनेनुसार शी क्षेत्र बद्रीनाथ येथे सरस्वती नदीच्या तीरावर विश्व वाग देवता सरस्वती मातेचे मंदिर प्रस्थापित करून भारताच्या संस्कृतीचा वारसा जगभर प्रसारित करण्याचे महत कार्य प्राध्यापक वि.दा. कराड सरांकडून प्रत्यक्ष समचरण पांडुरंगा ने करून घेतले आहे. आजच्या या त्यांच्या जन्मदिनी माऊलींच्या चरणी विनम्र प्रार्थना आहे की त्यांच्या हातून या पुढेही सामाजिक अध्यात्मिक व सांस्कृतिक वारसा जगापुढे आणण्या करता त्यांना निरोगी आयुष्य लाभो . जीवेत शरदः शतम

# स्वत:ला राजे समजणा–यांना जनतेने घरी बसवावे

बीड : उल्हासनगरची घटना दुर्दैवी आहे. राजकारणाची पातळी पूर्णपणे घसरली आहे. जिथे मसल पॉवर नव्हतं, तिथे मसल पॉवर यायला लागले, सत्ता हा पैसा असेच जोडले. या घटनेचा सर्वांनी निषेध करायला पाहिजे. तुमचे लोकशाहीत कितीही मतभेद असले तरी तुम्ही राजे नाही. तुम्हाला लोक राजे बनवतात. तेव्हा लोकशाहीत मर्यादेत राहून निवडून आलेल्या आमदाराने स्वत:वर नियंत्रण ठेवणे गरजेचे आहे. असे स्वत:ला राजे समजायला लागलेत अशांना घरी बसवावे असे आवाहन वंचित बहुजन आघाडीचे नेते प्रकाश आंबेडकर यांनी जनतेला केले.बीड येथे पत्रकारांशी प्रकाश आंबेडकरांनी संवाद साधला. त्यात ते म्हणाले की, एक–दोन घटनेवरून गृहमंत्री अपयशी झालेत की पूर्ण यंत्रणा कोलमडली आहे हा प्रश्न आहे. प्रत्येकवेळी घटना घडली त्यानंतर राजीनामा द्यावा अशी मागणी होते. परंतु ती घटना घडणार नाही याकडे लक्ष दिले पाहिजे. त्यानंतरही अशा घटना घडल्या तर ते अपयशी ठरतायेत असं म्हणता येईल असं त्यांनी सांगितले.तर बीड येथे संताचा कार्यक्रम आहोत. त्यामुळे कुणी ना कुणी येणारच. भाजपाकडून देवेंद्र फडणवीस येतायेत. त्याच्यामुळे आम्ही एकत्र आलोय हे बोलणे अर्थ नाही. या घटनेतून फार अर्थ काढण्याची गरज नाही. मला जे काही करायचे ते उघड करत असतो.

# लोकशाहीवरील हल्ल्याविषयी नागरिकांनी व्यक्त झालेच पाहिजे - साहित्यिक विजय चव्हाण

लातूर :- ज्या थोर महापुरुषांनी आमच्यापुढे सर्वांनी गुण्यागोविंदाने नांदावे असे आदर्श निर्माण केले,त्याप्रमाणे आचरण होणे अभिप्रेत असताना आज देशातले वातावरण अस्वस्थ करणारे आहे,असे सांगून लोकशाहीवर होत असलेल्या हल्ल्याविषयी समाजातील जागरुक नागरिकांनी उत्स्फूर्तपणे व्यक्त झालेच पाहिजे असे प्रतिपादन माजी मुख्याध्यापक,संत साहित्यिक विजय चव्हाण यांनी येथे केले.

सम्राट अशोक सार्वजनिक वाचनालयाच्या स्वा.सै. सं.नगर सोसायटीतील विस्तारी वाचन कक्ष-अभ्यासिकेत शुक्रवार,दि.२६ जानेवारी २०२४ रोजी ७४ व्या प्रजासत्ताक दिनानिमित्त आयोजित व्याख्यान प्रसंगी प्रमुख मार्गदर्शक म्हणून चव्हाण बोलत होते.अध्यक्षपदी ॲड.सुधाकर आरसुडे हे होते.मंचावर प्रा.भास्कर सुरवसे यांची विशेष उपस्थिती होती.

प्रारंभी भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे मान्यवरांच्या हस्ते पूजन,झेंडावंदन व राष्ट्रगीत झाले.मान्यवरांची गुलाबपुष्पाने स्वागत झाले.

पुढे बोलताना विजय चव्हाण म्हणाले की,आज व्यक्त होण्याची अनेक साधने आली तरी ग्रंथांचे महत्व कमी झालेले नाही.समाजाच्या उत्थानासाठी वाचनालयांची गरज आहेच. संवादाची साधने खुप आली तरी संवाद मात्र हरवत चालला आहे,भारतीय संविधानाने दिलेल्या मूल्यांवर घाला घालण्याचे षडयंत्र चालू आहे,अशावेळी जात,धर्म याच्या पलिकडे जावून मानवी हितासाठी व्यक्त होणे गरजेचे आहे नाहीतर आपण माणूस म्हणून घेण्याच्या लायकीचे नाहीत,असेही ते म्हणाले.

प्रा.भास्कर सुरवसे यांनी आजची व्यवस्था जनसामान्यांची दिशाभूल करुन वेगळ्याच मार्गाला नेवू पाहात आहे,विज्ञान नाकारून पुन्हा अज्ञान लादण्याचा प्रयत्न होतोय



याचा जाणकरांनी विचार करुन समाजाला योग्य दिशा देण्याची आवश्यता आहे,ती ग्रंथालयाच्या माध्यमातून होईल,असे सांगितले.

ग्रंथालयाच्या माध्यमातून ज्ञानाची ज्योत प्रज्वलित होत आहे, महापुरुषांनी केलेले कार्य येथे होतेय,ग्रंथालय हे ज्ञानाचे पंढरपूरच आहे,असे विचार ॲड. सुधाकर आरसुडे यांनी अध्यक्षीय समारोपात व्यक्त केले.

यावेळी उपस्थित बालवाचकांनी सारे जहाँ असे अच्छा हे गीत सादर केले. कार्यक्रमाचे प्रास्तविक व सूत्रसंचालन बी.जी.होळीकर यांनी केले.लिपीक संकेत होळीकर यांनी आभार मानले.कार्यक्रमाला ग्रंथपाल अंजुषा काटे,शिपाई वैशाली नागटिळक,सामाजिक कार्यकर्ते अजहर शेख,गौरी शिंदे,अक्षरा कदम,स्मिता शिंदे,भूमी माने,श्रावणी शिंदे,अथर्व कदम आदी बालवाचक उपस्थित होते.

## प्रांतीय भाषांचा विकास नाही झाल्यास सामान्य माणूस ज्ञान व विचारापासून वंचित राहील दुबई येथील अधिवेशनामध्ये प्राचार्य डॉक्टर नागोराव कुंभार यांचे प्रतिपादन

दुबई :- राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या मते स्वराज्य अर्थपूर्ण होण्यासाठी प्रांतीय भाषेचा विकास होणे व त्या समृद्ध करणे आवश्यक आहे,यामुळे सुशिक्षित लोक व सामान्य जनता यांच्यातील दरी कमी होऊन त्यांच्यामध्ये संवाद वाढेल. सामान्यांचा स्वराज्य व देश उभारणीत सहभाग वाढेल. लोकातील अज्ञान कमी होईल व ते चुकीच्या बंधनात अडकणार नाहीत.परंतु प्रांतीय भाषांचा विकास नाही झाल्यास सामान्य माणूस नवीन ज्ञान आणि नवीन विचारापासून वंचित राहील,असे प्रतिपादन प्राचार्य डॉक्टर नागोराव कुंभार यांनी केले.

दुबई येथे भाषा सहोदरी हिंदी,दिल्ली द्वारा २२ व २३जानेवारी २०२४ या कालावधीतआयोजित दहाव्या दोन दिवसीय आंतरराष्ट्रीय अधिवेशनात महात्मा गांधीजींचे भाषाविषयक विचार या विषयावर शोधनिबंध सादर करताना ते बोलत होते.

डॉक्टर कुंभार म्हणाले महात्मा गांधीजींच्या मते संपूर्ण देशासाठी एक राष्ट्रभाषा असली पाहिजे. हिंदी भाषेचा राष्ट्रभाषा म्हणून स्वीकार करावा या मताचे ते होते कारण हिंदी भाषा देशातील सर्व राज्यात कमी जास्त प्रमाणात बोलली जाते.इंग्रजीच्या तुलनेत हिंदी भाषा शिकणे अधिक सोपे असते. हिंदी भाषा सरळ आहे. शासकीय कर्मचार्यांना वापरण्यासाठी सोपी आहे. हिंदी भाषेमध्ये सामाजिक, राजकीय , संस्कृतिक सांस्कृतिक आणि आर्थिक क्षेत्रामध्ये विचारांचे आदान प्रदान करणे शक्य आहे.हिंदीचा वापर सैन्यामध्ये देखील केला जातो.यामुळे ते हिंदीचा राष्ट्रभाषा म्हणून स्वीकार करावा असे ते सुचवितात. दुबई येथील भारतीय दुतावासातील सभागृहामध्ये संपन्न झालेल्या या अधिवेशनाचे उद्घाटन भारतीय काऊनसलेट जनरल कुमार सीवान यांच्या हस्ते झाले. या समारंभास प्रमुख अतिथी म्हणून लैला रेहाल व तारू मामू या अधिकारी उपस्थित होत्या. सदरचे अधिवेशन यशस्वी होण्यासाठी जय कांत मिश्रा, अध्यक्ष,भाषा सहोदरी - हिंदी, मुख्य प्रबंधक मीना चौधरी आणि त्यांच्या सर्व सहकार्यांनी अथक परिश्रम घेतले.




छाया कप्शनःइदुबई येथील आंतरराष्ट्रीय अधिवेशनात प्राचार्य डॉक्टर नागोराव कुंभार यांना सहदोरी सन्मान उपाधीने सन्मानित करण्यात आले.त्यावेळी संस्थेचे प्रमुख प्रबंधक मीना चौधरी,डॉक्टर आर.के.सिन्हा दिसत आहेत.

## लातूरात हृदय रुग्ण सेवा गौरव पुरस्कार वितरण सोहळयाचे आयोजन

लातूर दि. ०३ रोटरी क्लब ऑफ लातूर होयराजन आणि विवेकानंद रुग्णालय, लातूर यांच्या संयुक्त विद्यमाने रविवार दि. ०४ फेब्रुवारी २०२४ रोजी दु. ०२ वा. विवेकानंद रुग्णालयाच्या सभागृहामध्ये हृदय रुग्ण सेवा गौरव पुरस्कार वितरण सोहळा आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विवेकानंद रुग्णालयाचे संस्थापक पद्मभूषण डॉ. अशोक कुकडे (काका) हे उपस्थित राहणार असून प्रमुख पाहुणे म्हणून जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे, जिल्हा पोलीस अधीक्षक सोमय मुंडे, रोटरी डिस्ट्रिक्ट ३१३२च्या प्रांतपाल रो. स्वाती हेरकल यांची उपस्थिती लाभणार आहे. भारतीय स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सव वर्षानिमित्त रोटरी क्लब ऑफ लातूर होरायझन आणि विवेकानंद रुग्णालय, लातूर यांच्या संयुक्त विद्यमाने मराठवाडा आणि कर्नाटक राज्यातील विविध भागातून आलेल्या ३८ लहान बालकांच्या (वय २ ते १५ वर्ष) व ६८ (महिला व पुरुष) रुग्णांच्या अशा एकूण १०६ शस्त्रक्रिया (ओपन हार्ट सर्जरी) मोफत करण्यात आल्या आहेत. या शस्त्रक्रियेत विवेकानंद रुग्णालयातील डॉक्टर्स आणि कर्मचाऱ्यांनी जे भरीव योगदान दिले त्याबद्दल त्यांचा यथोचित सन्मान करण्यासाठी या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या सेवा गौरव पुरस्कार वितरण सोहळ्यामध्ये डॉ. शितल गटागट, डॉ. सारंग गायकवाड, डॉ. प्रवीण लव्हाळे, डॉ. चंद्रशेखर औरंगाबादकर, डॉ. नितीन येळीकर, डॉ. यतीन्द्र अष्टपुत्रे, डॉ. प्रमोद तोष्णीवाल, डॉ. अश्विनी जाधव, डॉ. आरती अष्टपुत्रे, डॉ. श्याम कुलकर्णी, डॉ. कल्याणी सास्तुरकर, नेताजी भुईवार, दत्ता पळसे आणि शिवाजी उपळे यांचा मान्यवरांच्या हस्ते गुणगौरव करण्यात येणार आहे. या कार्यक्रमाला रोटरी परिवारातील सर्व अध्यक्ष, सचिव, सदस्य, शहरातील नागरीक आणि पत्रकार बंधूंनी उपस्थित राहण्याच्या आवाहन प्रोजेक्ट चेअरमन प्रा. बसवराज पणूरे, अध्यक्ष रो. विश्वनाथ स्वामी सावळे, विवेकानंद रुग्णालयाचे ज्येष्ठ डॉ. गोपीकिशन भराडिया, सचिव महादेव पांडे आणि रोटरी क्लब ऑफ लातूर होयराजन मधील सर्व सदस्यांनी केले आहे.

## मुक्ता सोळुंके राज्यस्तरीय विलासरावजी देशमुख ज्ञानरत्न पुरस्काराने सन्मानित

लातूर: जिल्हा परिषद प्राथमिक शाळा नऊलाख उंबरे ता. मावळ जि. पुणे येथील सहशिक्षिका श्रीमती मुक्ता सोळुंके यांच्या सामाजिक व शैक्षणिक कार्याची दखल घेऊन महाराष्ट्र प्रदेश शिक्षक प्रतिनिधी सभेच्या वतीने ९ वे राज्यस्तरीय शिक्षक साहित्य संमेलन लातूर येथे नुकतेच पार पडले. या साहित्य संमेलनात त्यांना राज्यस्तरीय विलासराव देशमुख ज्ञानरत्न पुरस्काराने शाल, सन्मानपत्र व सन्मानचिन्ह देऊन त्यांना सन्मानित करण्यात आले.




प्रत्येक तीन वर्षांनी महाराष्ट्र प्रदेश शिक्षक प्रतिनिधी सभेच्या वतीने राज्यात उत्कृष्ट काम करणाऱ्या शिक्षकांना हा मानाचा पुरस्कार देण्यात येतो. यावर्षी पुणे जिल्ह्यातून मुक्ता सोळुंके यांची निवड करून हा पुरस्कार पंढरपूर देवस्थानचे सहअध्यक्ष ह भ प गहिनीनाथ महाराज औसेकर,आ.बाबासाहेब पाटील, संमेलनाध्यक्ष ऋषिकेश कांबळे,संयोजक तथा शिक्षक नेते कालिदास माने,महाराष्ट्र राज्य कास्ट्राईब संघटनेचे राज्य सचिव यु.डी.गायकवाड, आरसीसीचे संचालक प्रा.शिवराज मोटेगावकर,लातूर जिल्हा पत्रकार संघाचे अध्यक्ष अशोक देडे , महाराष्ट्र विकास आघाडीचे राष्ट्रीय उपाध्यक्ष बसवतप्पा उबाळे यांच्या हस्ते मुक्ता सोळुंके यांना पुरस्कार देण्यात आला. या पुरस्कार सोहळ्यास राज्यभरातून शिक्षक-शिक्षिका उपस्थित होत्या.

मुक्ता सोळुंके यांना पुरस्कार मिळाल्याबद्दल शाळेच्या मुख्याध्यापिका सुनंदा दहितुले,शामराव इंदुरे,सुवर्णा मोघे,किसन भंडारे व सर्व शिक्षकवृंद यांनी स्वागत केले तसेच समाज बांधव व संघटनेच्या कार्यकर्त्याकडून अभिनंदनचा वर्षाव होत आहे.

## ए बी व्ही पी चे वलांडी येथे ६ वर्षाच्या चिमुकलीवर झालेल्या अत्याचाराचा विरोधात उदगीर मध्ये निषेध मार्च

उदगीर :- अखिल भारतीय विद्यार्थी परिषद, उदगीर शाखेच्या वतीने वलांडी ता. देवणी येथे ६ वर्षाच्या चिमुकलीवर झालेल्या अत्याचाराच्या विरोधात छत्रपती शिवाजी महाविद्यालय येथून निषेध मार्च काढून छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे निषेध व्यक्त करण्यात आले. देवणी तालुक्यामध्ये असलेल्या वलांडी गावामध्ये सहा वर्षाच्या मुलीवर एका नराधमाने सलग पाच दिवस लैंगिक अत्याचार केले. जिहादी वृत्तीची मानसिकता असणाऱ्या या नराधमाने अवघ्या सहा वर्षाच्या मुलीवर अत्याचार केल्यानंतर अभाविप उदगीर शाखेच्या वतीने या वृत्तीचा निषेध छत्रपती शिवाजी महाराज चौक, उदगीर येथे करण्यात आला व या नराधमाला लवकरात लवकर फाशीची शिक्षा देण्यात यावी अशी मागणी करण्यात आली.

जिहादी वृत्ती असणाऱ्या लोकांकडून समाजातील महिला सुरक्षित नाहीत, अशा वृत्तीला आळा घालण्याचे काम सरकारने करावे, हिंदुत्ववादी म्हणून घेणाऱ्या सरकारला रामराज्य व स्वराज्यातल्या महिला कशा सुरक्षित राहत होत्या याचा विसर पडलेला दिसतोय आणि या सरकारचा धाक राहिलेला दिसत नाही. त्यामुळे जिहादी वृत्तीचे नराधम अशा घटना करताना दिसत आहेत. सरकारने या जिहादी वृत्तीच्या विरोधात कठोर कारवाई करावी. असे मत अभाविप लातूर विभाग संयोजक विशाल स्वामी यांनी व्यक्त केले. यावेळी भाजपा शहर अध्यक्ष मनोज पुदाले शहरमंत्री आदिनाथ मिरकले, सहमंत्री सुमित लाल, आदित्य पाटील, नितीश शिरसे, अरविंद गुंडिले, पृथ्वीराज बिरादार, दिनेश भोसले, गणेश बिरादार, प्रभात सूर्यवंशी, संध्या हत्ते, धनश्री लाळे, वैभवी लाळे, पल्लवी पाटील, वैशाली राठोड, प्रीती बिरादार, गायत्री कसबे, राजनंदिनी कांबळे, आनंद साबणे, अभिजीत पाटील सह आदी विद्यार्थी विद्यार्थीनी व उदगीर शहारातील नागरिक उपस्थित होते.




# किनवट आरोग्य विभागाचा भोंगळ कारभार तालुका आरोग्य अधिकाऱ्यांचे दुर्लक्ष:

किनवट/ ता.प्रतिनिधी.शेख शौकत :- तालुक्यातील रूग्णांसाठी तालुका आरोग्य अधिकारी कार्यालय मुख्य असून केंद्र व महाराष्ट्र शासन विविध लोक उपयोगी आरोग्य योजना या कार्यालयामार्फत राबवित असते. सदर कार्यालयांतर्गत ९ प्राथमिक आरोग्य केंद्र येतात. तालुका आरोग्य अधिकारी डॉ किशन गायकवाड यांना तालुका आरोग्य अधिकारी कार्यालयांचा अतिरिक्त पदभार घेऊन पाच महिन्याचा कालावधी उलटला असून सुरुवातीला तालुका आरोग्य अधिकारी यांच्याकडून किनवट तालुक्याच्या आरोग्य सुविधा सुधारण्यासाठी चांगले काम होईल अशी अपेक्षा होती पण त्यांनी सुद्धा आरोग्य विभागाच्या दुरावस्थेत भर घालून चाल रे माझ्या मागच्या याप्रमाणेच कारभार सुरू ठेवला. त्यांच्या आधीनिस्त कर्मचाऱ्यावर त्यांचा कुठलाही वचक नसून अधिकारी कर्मचारी बिनधास्त गैरहजर असतात. अनेक वेळा प्राथमिक आरोग्य केंद्र व हिंदूहृदय सम्राट सम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना यांना कुलूप लावून असल्याचे त्यांचे अनेक वेळा निदर्शनास आणून देऊन सुद्धा त्यांनी कुठलीही कार्यवाही केली नाही. त्यांच्या स्वतःच्या कार्यालयात अनेक कर्मचारी गैरहजर असतात.

सदर कार्यालयाचे लेखापाल व क्षयरोग पर्यवेक्षक हे तर कधीच कार्यालयात येत नसल्याचे दिसून येते. अनधिकृत बाहेरील व्यक्तीकडून नाममात्र मोबदला देऊन कामे करून घेतल्या जात असून नियमाने शासकीय कर्तव्यावर असणारे कर्मचारी मात्र घरी बसून वेतन घेतात. आरोग्य विभागाला लागलेला प्रतिनियुक्तीचा जुनाच आजार हा त्यांच्या अर्थपूर्ण व्यवहारातून वाढत असल्याच्या शंका घ्या[illegible] वाव आहे. समुदाय आरोग्य अधिकारी व इतर कर्मचारी यांच्यावर त्यांचा कुठलाच वचक नसून त्यांना कारवाईची भीती दाखवून गैरहजर असलेले ग्रामीण भागातील कर्मचारी शोधून त्यांच्याकडून त्यांच्या खास व्यक्तीकडून वसुली करत असल्याचे चर्चा सुद्धा आहे. मागील तालुका आरोग्य अधिकारी यांच्या काळात कर्मचाऱ्याकडून वसुली करणारी क्लिप व्हायरल होऊन सुद्धा सदर कार्यालयाचा कारभार सुधारण्याच्या मार्गावर नाही असे दिसून येते. काही कामानिमित्त कार्यालयात गेल्यास मोजके एक दोन कर्मचारी दिसतात कुठे गेले विचारणा केल्यास पंचायत समिती गेले, बँकेत गेले असे उडवा उडवी चे उत्तर देऊन बोळवण करतात. अनेक वेळा कर्मचारी गैरहजर असल्याबाबत लेखी तक्रार देऊन सुद्धा कुठलेही कार्यवाही न करता सदर कर्मचाऱ्यांना अभय देऊन त्यांचे मनोधैर्य वाढविण्याचे काम या कार्यालयाकडून चालू आहे. जिल्हास्तरावरील वरिष्ठ अधिकाऱ्याकडून लक्ष दिल्यास कार्यालयाचा कारभार सुधारून दुर्गम आदिवासी बहुल तालुक्यातील नागरिकांना सुलभ प्रभावी आरोग्य सुविधा मिळतील अशी आशा नागरिकातून व्यक्त होत आहे.




## गणपत गायकवाड यांनी केलेले आरोप गंभीर, मुख्यीमंत्र्यांनी राजीनामा द्यावा

मुंबई : महाराष्ट्रात कायद्याचे राज्य राहिलेले नाही, कायदा व सुव्यवस्थेचे तीनतेरा वाजले आहेत. सत्ताधारी पक्षाचे आमदार पोलीस स्टेशनमध्येच गोळीबार करत आहेत यावरून महाराष्ट्रात जंगलराज आल्याचे स्पष्ट होत आहे.मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, गृहमंत्री यांचा पोलीसांवर प्रचंड दबाव असून कायद्याने काम करु दिले जात नाही. आमदार गणपत गायकवाड यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर केलेले आरोप अत्यंत गंभीर आहेत, त्यामुळे त्यांच्यात थोडीशी नैतिकता शिल्लक असेल तर त्यांनी तात्काळ आपल्या पदाचा राजीनामा द्यावा, अशी मागणी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले यांनी केली आहे.उल्हासनगर पोलीस स्टेशनमध्ये सत्ताधारी पक्षाच्या आमदाराने गोळीबार केल्याप्रकरणी काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी सरकारचा खरपूस समाचार घेतला. नागपूर येथे प्रसार माध्यमांशी बोलताना पटोले पुढे म्हणाले की, उल्हासनगरमधील झालेल्या घटनेचा काँग्रेस पक्ष तीव्र निषेध करत आहे. भाजपा आमदार गणपत गायकवाड प्रकरणात शिंदे-भाजपा सरकार काय कारवाई करते ते आम्ही पाहत आहोत परंतु या प्रकरणाने भाजपाचा बुरखा फाडला गेला आहे. पोलिस स्टेशनमध्येच गोळीबार करण्याची हिम्मत ही सत्तेचा माज दाखवते, हे कसले रामराज्य? पोलिसांवर सत्ताधा-यांकडून प्रचंड दबाव आहे, वरिष्ठ आयपीएस अधिका-यांमध्ये दहशत आहे, सत्ताधारी आमदाराचे ऐकले नाही तर लगेच बदली केली जाते.

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE